# सयुंक्त वनव्यवस्थापन समिती
# संकलित शासन निर्णय

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वनविभाग**

(प्रथम शासन निर्णय)

शासन निर्णयक्रमांक .एस.एल .एफ
१०९१/प्र. क.११९/फ- ११,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक १६ मार्च १९९२

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वनविभाग**

(द्वितीय शासन निर्णय)

शासन निर्णयक्रमांक .एम.एस .सी
२०००/प्र. क.१४३/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक २५ एप्रिल २००३

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वनविभाग**

संत तुकाराम वनग्राम योजना

शासन निर्णयक्रमांक .एफ.डी.एम
२००५/प्र. क.३१३/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक २३ नोव्हेंबर २००६

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वनविभाग**

(प्रथम शासन निर्णय)

शासन निर्णयक्रमांक .एफ.डी.एम
२०११/प्र. क.१००/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक ५ ऑक्टोबर २०११

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वनविभाग**

एल.पी.जी.गैस वाटप शासन निर्णय

शासन निर्णयक्रमांक .एम.डी.एम
२०१२/प्र. क.४/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक १० जूलै २०१२

Scanned by CamScanner

# सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वनविभाग

### (प्रथम शासन निर्णय)

**शासन निर्णयक्रमांक .एस.एल .एफ १०९१/प्र. क.११९/फ- ११,**

**मंत्रालय मुंबई ४०००३२**

**दिनांक १६ मार्च १९९२**

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एसएलएफ-१०९१/प्र.क्र.११९/फ-११,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १६ मार्च, १९९२.

वाचावे : १) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाचे पत्र क्र.६-२१/८९-एफ.पी., दिनांक १.६.१९९०.

निर्णय :-

वनक्षेत्रातील अवैध तोड निरनिराळ्या कारणास्तव वाढतच चालली आहे. या अनिष्ट प्रवृत्तीला आळा घालण्यात केवळ शासकीय यंत्रणा वा कायदा उपयुक्त ठरणार नाही. वनसंपत्तीच्या संरक्षणात जनतेच्या सहकार्याची नितांत गरज आहे. देशाच्या अर्थपूर्ण विकासात वनांचे संवर्धन करुन त्यांना उत्पादक घटक म्हणून विकसित करणे व त्याकरिता पोषक असे व्यवस्थापन लोकांच्या सहभागातून साध्य करावयाचे दायित्व वन विभागाकडे आहे. राष्ट्रीय वननीती १९८८ अन्वये वनक्षेत्रांचा विकास करण्यासाठी व वनसंरक्षणामध्ये लोकांचा सहभाग अभिप्रेत आहे. त्यादृष्टीने केंद्र शासनाच्या पर्यावरण आणि वनमंत्रालयाने सर्व राज्य शासनांना दिनांक १.६.१९९० च्या पत्राने महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्वे कळवून लोकांच्या सहभागाने अवनत वनक्षेत्राचे पुनरुज्जीवन साधण्यासाठी एक योजना तयार करावी अशी विनंती केली आहे.

२. केंद्र शासनाने केलेल्या विनंतीचा सखोल अभ्यास आणि संबंधित शासकीय विभागांशी सल्लामसलत करुन महाराष्ट्र शासनाने आता ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापनेच्या-बाबत एक अतिमहत्वाचा व पुरोगामी निर्णय घेतला आहे.

३. महाराष्ट्र राज्याच्या वन विभागाच्या लोकाभिमुख कार्यक्रमाची व निवड करावयाच्या क्षेत्राची रूपरेषा खालीलप्रमाणे राहील :-

ग्रामीण परिसरातील उजाड व अवनत वन व वनेतर क्षेत्राचा उपयोग या कार्यक्रमासाठी प्राधान्याने केला जाईल.

प्रस्तावित कार्यक्रम स्थानिक ग्रामपंचायतीच्या सहकार्याने राबविला जाणार असून, निवड केलेल्या वनक्षेत्रात नैसर्गिक पुनरुज्जीवन, संरक्षण व वनीकरण याद्वारे वनक्षेत्रातून मिळणारे उत्पादन स्थानिकांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी अग्रक्रमाने उपलब्ध करुन दिले जाणार असल्यामुळे त्यांच्या हक्कांवर बंधने येऊ नयेत म्हणून खाजगी व्यक्ती अथवा संस्था तसेच वनउपजांवर आधारीत औद्योगिक प्रतिष्ठानांना करारनाम्यानुसार दिलेले क्षेत्र या कार्यक्रमातून वगळण्यात येईल.

गावाच्या परिसरातील वनेतर क्षेत्र जर मुबलक प्रमाणात उपलब्ध असेल अथवा ते वनक्षेत्रात संलग्न असेल व प्रस्तावित योजनेच्या अंमलबजावणीसाठी या वनेतर जमिनीची गरज

शामुमु. रोटा/म.व व.वि./एच-९८३ (१२००--९२)

असेल तर अशा प्रमिनींचा अंतर्भावही या योजनेत करता येईल. तसेच ग्रामस्थांनी व ग्रामपंचायतींनी सहमती दिल्यास गट नं/गावठाणासाठी असलेल्या क्षेत्रात ही योजना राबविता येईल.

सदरच्या कार्यक्रमात वनक्षेत्र करारनाम्याने देणे अभिप्रेत नाही. संरक्षण व विकासाचे कामासाठी राखीव व संरक्षित वनांचे कंपार्टमेंट नंबर व सर्वे नंबर क्षेत्रिय वनसंरक्षक गावासाठी निश्चित करतील व निस्ताराची गरज व ग्रामपंचायतीचा संरक्षण कामातील उत्साह लक्षात घेऊन अशा प्रकारे निश्चित करावयाचे आहे.

प्रस्तावित कार्यक्रमाचे उद्दिष्ट वनवासी, आदिवासींच्या दैनंदिन विषयक गरजांची टंचाई निवारण करणे असे आहे म्हणून या कार्यक्रमात जोड कृषि उत्पादन अभिप्रेत नाही. तसेच वनसंरक्षण कायदा १९८० चे वैधानिक तरतुदींना बाधा येईल असे कोणतेही करारनामे, व्यक्ती, संस्था अगर ग्रामपंचायतीशी केले जाणार नाहीत.

४. या योजनेची तत्वे खालीलप्रमाणे आहेत:-

अ] खेडेगांवाजवळ असलेल्या अवनत क्षेत्राचे पुनरुज्जीवन, वनसंरक्षण समित्यांद्वारे केले जाईल. या समितीवर गावातील जवळजवळ सर्व कुटुंबांना प्रतिनिधीत्व मिळेल.

ब] वनक्षेत्राचे संरक्षण, रोपांचे संगोपन, इत्यादी जबाबदाऱ्या वनसंरक्षण समिती/स्थानिक लोक स्विकारतील.

क] वनसंरक्षण समिती एक कार्यकारी मंडळ नियुक्त करेल व कार्यकारिणी समिती या योजनेचा तपशील तयार करेल.

तसेच योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ते निर्णयही घेईल. परंतु सर्व धोरणात्मक बाबी वनसंरक्षण समितीच्या संमतीने अंतिम करण्यात येतील.

ड] अवनत वनक्षेत्राचे पुनरुज्जीवन झाल्याने मिळणाऱ्या वनोपजांचा फायदा वनसंरक्षण समिती/स्थानिक जनतेस काही मापदंडानुसार द्यावयाचा आहे.

इ] स्वायत्त संस्थांचा फायदा ही योजना राबविण्यासाठी घेणे शक्य आहे. परंतु स्वायत्त संस्थांना कोणत्याही प्रकारचा फायदा अनुज्ञेय नाही.

सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या सहकार्याने या योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे म्हणून ग्रामपंचायतीकडून ह्या योजनेला पाठिंबा देणारा ठराव मंजूर करून घेणे आवश्यक आहे. असा ठराव प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागीय वनाधिकाऱ्यांनी प्रथम स्थानिक ग्रामस्थांशी, सरपंच आणि ग्रामपंचायतीच्या इतर पदाधिकाऱ्यांशी चर्चा करावी आणि ग्रामसभा घेऊन वनसंरक्षण समितीच्या सदस्यांची निवड करावी. अशा ग्रामपंचायतीच्या हद्दीत ही योजना राबवितांना स्वायत्त संस्थांचे सहकार्य आवश्यक वाटल्यास विभागीय वनाधिकाऱ्यांनी ते घ्यावे. अशा परिस्थितीत कार्यकारी मंडळावर स्वायत्त संस्थांचे दोन प्रतिनिधी सदस्य म्हणून घेण्यात यावे. कार्यकारी मंडळाची निवडही याप्रकारे करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्यात जंगल कामगार सहकारी संस्थांचा उपयोगही या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी करून घेता येईल. मात्र जंगल कामगार सहकारी संस्थांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीस आपला सभासद करून घ्यावे. जेथे ग्रामपंचायती व जंगल कामगार सहकारी संस्था यांचे कार्यक्षेत्र एकच असेल तेथे ही योजना कोणी राबवायी याचा निर्णय गुणवत्तेवर घेण्यात यावा. मात्र जंगल कामगार सहकारी संस्थांची बिकट आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शक्यतो त्यांनाच ही योजना राबविण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे.

५. या योजनेचा तपशील व स्वरूप खालीलप्रमाणे राहील:-

कार्य आयोजना

क्षेत्रीय उप वनसंरक्षक, गावासाठी कार्यक्रमाखाली निवड केलेल्या क्षेत्राची कार्य आयोजना तयार करतील. या कार्य आयोजनेत खालील तपशील अंतर्भूत राहील:-

नैसर्गिक पुनर्उत्पत्तीचे क्षेत्र.

प्रचलित जनता वाढविण्याबाबत योजना.

वनीकरणाचे स्वरूप/नमुने.

लागवडीच्या प्रजातींची शिफारस.

मृदा संधारण कार्य.

सरहद्दीचे सिमांकन,

रोपवनाची देखभाल.

कार्य आयोजना तयार करणारे अधिकारी वन विभागाचे क्षेत्रीय उप वनसंरक्षक हे राहतील.

कार्यआयोजनेचा कालावधी १० वर्षांचा असेल.

उप वनसंरक्षक यांनी तयार केलेली कार्यआयोजना मंजूर करणाऱ्या समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| | |
|---|---|
| १] वनसंरक्षक | : अध्यक्ष |
| २] उप वनसंरक्षक [कार्य आयोजना] | : सदस्य |
| ३] सह संचालक, सामाजिक वनीकरण | : सदस्य |
| ४] उप संचालक, सामाजिक वनीकरण | : सदस्य |
| ५] व ६] कार्यकारी मंडळातील दोन लाभार्थी | : सदस्य |
| ७] क्षेत्रीय उप वनसंरक्षक | : सदस्य-सचिव |

वरील कार्य आयोजनेची अंमलबजावणी वन विभागाच्या छत्राखाली करण्यात यावी. तसेच प्रत्यासाठी वर्गीकृत केलेल्या क्षेत्रांच्या वरील कार्य आयोजनेच्या संमतीने वन विभागाने मंजूर केलेल्या कार्य आयोजनेमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

६. योजनेखालील लाभार्थी सर्वसाधारणपणे संबंधित वनात वा वन सीमेवर राहणाऱ्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील व्यक्ती राहतील. त्या वन सीमेवर राहणाऱ्या प्रत्येक



Scanned by CamScanner

कुटुंबास या समितीचे सदस्य होण्याची संधी उपलब्ध राहील. मात्र, ही संधी अशा कुटुंबास मिळेल, की ज्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती प्रस्तावित वनसंरक्षण योजनेत व विशेषत: वनसंरक्षणाच्या कामात सहभागी होईल. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने देखील या योजनेत भाग घेतला तरी देखिल या योजनेतील सर्व अपेक्षित फायदे त्या कुटुंबास प्राप्त होतील.

७. या योजनेतील वनसंरक्षण समितीची रचना, कार्य व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील:-

उप वनसंरक्षक ग्रामपंचायतीशी सल्ला मसलत करुन वनसंरक्षण समितीच्या कार्य क्षेत्रातील लाभार्थींची निवड करुन वनसंरक्षण समिती संघटीत करतील.

वन सीमेवर राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबास या समितीचा सदस्य होण्याची संधी उपलब्ध राहील. मात्र अशा कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस (स्त्रियांसह) वन संरक्षणाच्या कामात सहभाग असेल तरच त्या कुटुंबांना हा पर्याय उपलब्ध राहील.

वनसंरक्षण समितीची कामे सुरळीत चालावी म्हणून ग्रामपंचायतीने ह्या समितीस संपूर्ण सहकार्य देणे जरूर आहे.

वनसंरक्षण समितीचे एक कार्यकारी मंडळ दैनंदिन कामे पार पाडण्यासाठी संघटित केले जाईल. कार्यकारी मंडळाची रचना खालीलप्रमाणे राहील:-

| | | |
|---|---|---|
| १) सरपंच | : पदसिध्द सदस्य | - सदस्य |
| २) ग्रामसेवक | : पदसिध्द सदस्य | - सदस्य |
| ३) वनपाल | : पदसिध्द सदस्य | - सदस्य सचिव |
| ४) लाभार्थींनी नियुक्त केलेले ६ सदस्य | : सदस्य | - सदस्य |
| ५) स्वायत्त संस्थांनी नामनिर्देशित केलेल्या २ व्यक्ती. [ज्या गावात स्वायत्त संस्थेने वनीकरण या इतर क्षेत्रात काम करुन, ग्रामस्थांचा विश्वास संपादीत केला आहे अशा गावांनाच ही तरतूद लागू होईल.] | : सदस्य | - सदस्य |

दरवर्षी वनसंरक्षण समितीच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थीपैकी कार्यकारी मंडळाचे सदस्य, निवडले जातील. या निवडणुकीवर वनक्षेत्रपाल देखरेख ठेवतील. लाभार्थींपैकी २ स्त्रिया व २ अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासलेल्या वर्गापैकी व्यक्तींना निवडून देण्याचे बंधन राहील. कार्यकारी मंडळाचे सदस्य कार्यकारी मंडळाच्या सभेत आपला अध्यक्ष निवडतील. वनपाल कार्यकारिणी समितीचा सदस्य-सचिव या नात्याने त्यांच्या बैठका नियोजित मुदतीप्रमाणे आयोजित करील.

कर्तव्ये

वनसंरक्षण समितीचे कार्यकारी मंडळ एक रजिस्टर घेऊन त्यात समितीचे प्राथमिक सभासदांची माहिती ठेवतील उदा:- नांव, पित्याचे नांव, पत्ता, वय, कुटुंबियांची संख्या, कुटुंब प्रतिनिधीचे नांव, इत्यादी. कुटुंबाचे प्रतिनिधीचा फॉर्म भरून कार्यकारी मंडळाने मंजूर करून रजिस्टरमध्ये चिकटवून ठेवावे. ही रजिस्टरे वनक्षेत्रपालाचे कार्यालयात कायमस्वरुपी म्हणून ठेवावीत.

वनसंरक्षण समिती एक इतिवृत्तांत रजिस्टर ठेवेल व त्यात कार्यकारी मंडळाच्या सभांचा इतिवृत्तांत वेळोवेळी नोंद करून ठेवला जाईल. तसेच ग्रामसभेच्या इतिवृत्तांताची अध्यक्षांच्या सहीने नोंद ठेवली जाईल. असा इतिवृत्तांत वनक्षेत्रपाल ह्यांस सादर केला जाईल.

वनसंरक्षण समिती वर्षातून एकदा ग्रामसभा आयोजित करील. त्यात कार्यकारी मंडळाने केलेले कामकाज व निस्तार वाटपाबाबत चर्चा होईल. तसेच कार्यकारी मंडळाचे सदस्यांची निवड होईल. त्याचप्रमाणे कार्यकारिणी मंडळाची बैठक कमीत कमी दर तीन महिन्यातून एकदा होईल.

कार्यपध्दती

अ) वनक्षेत्र व रोपवन क्षेत्राचे समितीचे सभासदांमार्फत संरक्षणाचे धोरण ठरविणे.

ब) वनक्षेत्र व रोपवन क्षेत्राचे समितीचे सभासदांमार्फत संरक्षण करणे.

वनक्षेत्र अथवा रोपवन क्षेत्रावर बुध्दीपुरस्सर अतिक्रमण करणे, बुध्दीपुरस्सर नाश करणे.

अशी अतिक्रमणे, नुकसान व अवैध तोडीस, विरोध करून प्रतिबंधक कार्यवाही करणे अथवा अवैध तोड करणाऱ्या गुन्हेगारांची नांवे व तपशील वन अधिकाऱ्यास अवगत करणे.

वन गुन्ह्याचे कामी गुन्हेगारास अटकाव करणे, पकडणे व कार्यवाही करण्यासाठी वन अधिकाऱ्यास सहाय्य करणे.

क) वनसंरक्षण समितीची वनविषयक कामे सुरळीतपणे व पद्धतशीरपणे पार पाडण्यास मदत करणे.

संबंधित वन अधिकाऱ्यास वन विषयक कामासाठी कामगार मिळविणे व त्यांचे व्यवस्थापन करण्याकामी सहाय्य करणे.

ड) वन विभागाला वन उपजाचे निष्कासी व संकलनाचे कामी सहाय्य करणे.

संबंधित वन अधिकाऱ्याला मिळाव मालाच्या ५० टक्के मालाचे निस्ताराचे सभासदांस [कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या व उप वनसंरक्षक ह्यांनी मंजूर केलेल्या यादीप्रमाणे] वाटप करण्यास सहाय्य करणे.

शासनाने मंजूर केलेल्या निस्ताराचा दुरुपयोग निस्तारीकडून केला जात नाही ह्याची खबरदारी घेणे व वनक्षेत्र व वनरोपण क्षेत्राचा कोणत्याही प्रकारच्या अतिक्रमणापासून बचाव करणे.

इ) भारतीय वनविषयक कायदा व इतर वन या वन्य प्राणी विषयक कायद्याच्या तरतुदींचा भंग करणाऱ्या गुन्ह्यावर प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे.

वनसंरक्षण समितीचा कोणताही प्राथमिक सभासद दुराग्रहाने व नुकसान करण्याचे

उद्देशाने स्वतःच वनक्षेत्रासंबंधी अथवा वनरोपण क्षेत्रासंबंधी दुष्कृत्य करत असेल तर बीट गार्ड, वनपाल अथवा वन क्षेत्रपालास कळवून त्याचे सभासदत्व रद्द करण्यास शिफारस करतील.

वनविषयक कायदे व नियम ह्यांचा भंग करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध अथवा सभासदां-विरुद्ध वैधानिक कार्यवाही करत असलेल्या वन अधिकाऱ्यास सक्रीय सहाय्य करणे व त्यास वन व वनरोपणाचे संरक्षणकामी मदत करणे.

८. या योजनेच्या कार्यक्षेत्रातील निस्तारीसंबंधी तरतूदी खालीलप्रमाणे राहतील.

ज्या वनक्षेत्रात निस्तार हक्क प्रचलित आहेत त्या वनक्षेत्रात ग्रामपंचायत, नागरी व वनसंरक्षण समिती या तिघांमध्ये एकवाक्यता असणे अनिवार्य आहे. अशा ठिकाणी वनोपजाचे वाटप करण्याची शक्यतो प्रचलित पध्दती अवलंबविण्यात यावी. तथापि जेथे निस्तार हक्क प्राप्त असलेल्या व्यक्तीने अथवा कुटुंबाने योग्य ती संधी मिळूनही वनसंरक्षणाच्या योजनेत भाग घेण्यास नकार दिला तर त्या व्यक्तीस या कुटुंबास या योजनेखालील कोणतेही फायदे मिळणार नाहीत.

९. वनोपजाचे फायदे देण्यासंबंधी कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात यावी:-

वनोपजाचा फायदा घेण्यास पात्र ठरण्यासाठी वनसंरक्षण समितीचे सभासदाने गावासाठी वर्ग केलेल्या वन व रोपवन क्षेत्राचे किमान पाच वर्ष संरक्षण करण्याच्या कार्यक्रमात सक्रीय सहभागी होणे जरूर आहे.

रोपवनाची वाढ १० वर्ष झाल्यानंतर व त्या रोपवनाचे व वनक्षेत्राचे वनसंरक्षण समितीने सातत्याने संरक्षण केले आहे हे तपासून असे उत्पादन परिपक्वतेस आले आहे म्हणून ते निस्तार वाटपास तयार झाले असे ठरेल. अशा क्षेत्रातून निष्कासित होणाऱ्या उत्पादनाचे वनसंरक्षण समितीच्या सभासदास वाटप करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करण्याचे काम वन अधिकारी करतील.

वनक्षेत्र अथवा रोपवन क्षेत्राला इजा न करता खालील बाबी वनसंरक्षण समितीचे सभासदास विनामूल्य प्राप्त करता येतील:-

अ) वाळून-गळून पडलेल्या झाडांच्या फांद्या, फळे, फुले, बीज [काजू वगळून] आणि पाने [तेंदू वगळून]

ब) वर्ग केलेल्या वनक्षेत्र व रोपवन क्षेत्रातील अंतरिम व अंतिम फायदे उत्पादने

वनक्षेत्र व रोपवन क्षेत्राचे अंतिम परिपक्वतेच्या उत्पादनाची निष्कासन वन विभाग/गा-कडून होईल त्यापैकी निष्कासित माल, इमारती फाटे, जळाऊ इत्यादीवर अग्रक्रमाने हक्क वनसंरक्षण समितीचे सभासदास उपलब्ध करुन देण्यात येईल. हा पुरवठा सवलतीच्या दराने केला जाईल व हे दर उप वनसंरक्षक व जिल्हाधिकारी ह्यांचे समन्वयाने ठरविण्यात येतील व हे बाजारभावाच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक राहणार नाहीत.

वनसंरक्षण समितीचे सभासदास सवलतीचे दराने पुरवठा केल्यानंतर शिल्लक राहिलेला माल वन विभाग लिलावाने विक्री करेल. ह्या लिलावात प्राप्त होणाऱ्या विक्री रक्कमेपैकी

[विक्रीकर, वन विकास कर व आयकर वजा जाता] ५० टक्के रक्कम वनसंरक्षण समितीस रोख दिली जाईल. अंतिम उत्पादनापासून मिळणारे फायदेही वरीलप्रमाणे उपलब्ध होतील.

क) सामाजिक वनीकरण योजनेअंतर्गत घेतलेल्या गट लागवडीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे वाटप ग्रामपंचायत व शासन यांचेमध्ये ९०% : १०% या प्रमाणात करावे असे शासनाचे दिनांक १७ सप्टेंबर, १९८५ च्या आदेशात नमूद केले आहे. तसेच ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या रकमेपैकी कमीत कमी २५ % रक्कम ग्रामपंचायतीने रखवालदार तसेच झाडांच्या संरक्षणाच्या देखभालीवर खर्च करावयाची आहे. याशिवाय एकूण उत्पन्नाच्या ५०% उत्पन्न स्थानिक जनतेस आरक्षित केले जावे व त्याची विक्री भूमिहीन मजूर व दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या व्यक्तींना व्हावी अशी अट आहे. अशा व्यक्तींना बाजारभावाच्या ५०% इतक्या भावाने विक्री करावी असे आदेशात स्पष्टपणे नमूद केले आहे. उरलेल्या उत्पन्नाची विल्हेवाट लिलावामार्फत केली जाईल व हा लिलाव गावातील रहिवाशांपुरताच मर्यादित राहील. भूमिहीन मजूर व दारिद्र्य रेषेखाली असलेल्या मजुरांच्या गवताची व सरपणाची गरज किती आहे याचा अंदाज पध्दतशीररित्या करण्यात यावा. वनोपजांचा पुरवठा अपेक्षा कमी पडल्यास त्याचे वाटप गुणोत्तर प्रमाणावर वाटावे. सर्व संबंधितांनी प्रस्तावित योजना गट लागवडीखाली आणलेल्या क्षेत्रात लागू करण्याचे ठरविले तर वनोपजांचे फायदे या योजनेत विहीत केलेल्या पध्दतीनुसार देण्यात यावेत.

ज्या वनोपजांच्या खरेदीचे अधिकार केवळ महाराष्ट्र आदिवासी विकास मंडळाकडेच आहे त्या वनोपजांची विक्री लाभार्थींनी/वनसंरक्षण समित्यांनी आदिवासी विकास मंडळामार्फत करावी.

१०. वनसंरक्षण समित्यांवर नियंत्रणात्मक तरतुदी खालीलप्रमाणे राहतील:-

<u>समिती बरखास्त करणे, अपिल इत्यादी</u>

वर उल्लेख केलेल्या शर्ती व अटींचा भंग करणे, तसेच भारतीय वन कायदा, १९२७ व नियमांचे उल्लंघन करणे ही बाब वनसंरक्षण समितीचे सभासदाचे प्राथमिक सदस्यत्व रद्द करण्यास पात्र ठरेल किंवा वनसंरक्षण समिती बरखास्त करण्यास पात्र ठरेल. ही कार्यवाही खालील वन अधिकारी करण्यास अधिकृत आहेत:-

वरील प्रकारच्या कारणावरून उप वनसंरक्षक वनसंरक्षण समिती बरखास्त करण्यास सक्षम आहेत. उप वनसंरक्षक ह्यांनी केलेल्या दंडात्मक कार्यवाहीविरुध्द वृत्ताचे वनसंरक्षकांकडे अपील करण्यात येईल. वनसंरक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम व दोन्ही बाजूंवर बंधनकारक राहील.

संबंधित वनक्षेत्रपालास अधिकार प्रदत्त करून उप वनसंरक्षक हे वन समितीच्या सभासदाचे प्राथमिक सदस्यत्व रद्द करण्यास अधिकृत करू शकतील व वरीलप्रमाणे कायदा व शर्तींचा भंग करणाऱ्या व्यक्तींविरुध्द वनक्षेत्रपाल वनसंरक्षण समितीच्या कार्यकारी मंडळाच्या शिफारशीवरून कार्यवाही करू शकतील. वनक्षेत्रपाल ह्यांनी केलेल्या दंडात्मक कार्यवाही विरुद्ध तालुका पंचायत समिती मार्फत उप वनसंरक्षक ह्यांस अपिल करता येईल. उप वनसंरक्षकांचा निर्णय अंतिम व दोन्ही बाजूंवर बंधनकारक राहील.



Scanned by CamScanner

११. वरील योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर परिस्थितीनुसार वेळोवेळी शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सल्ला देण्यासाठी तसेच योजनेचा आढावा घेण्याकरिता एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्यासाठी शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १] मा. मुख्य मंत्री | : अध्यक्ष |
| २] मा. वित्त मंत्री | : सदस्य |
| ३] मा. वनमंत्री | : सदस्य |
| ४] मा. ग्रामविकास मंत्री | : सदस्य |
| ५] मा. आदिवासी विकास मंत्री | : सदस्य |
| ६] चार स्वायत्त संस्थांनी | : सदस्य |
| ७] | : सदस्य |
| ८] | : सदस्य |
| ९] नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती | : सदस्य |
| १०] मा. सचिव [वित्त] | : सदस्य |
| ११] सचिव [ग्रामविकास] | : सदस्य |
| १२] सचिव [आदिवासी विकास] | : सदस्य |
| १३] सचिव [नियोजन] | : सदस्य |
| १४] सचिव [वने] | : सदस्य |
| | : सदस्य-सचिव |

१२. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ७७०/९१/व्यय-१०, दिनांक २८.१.१९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

टी. बालाराम,
शासनाचे सचिव.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा. मुख्य मंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. वनमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
सर्व अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
विकास आयुक्त व प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, महसूल व वन विभाग [वने], मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned by CamScanner

सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक, सर्व वनवृत्ते.
सर्व महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते.
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
विभागीय आयुक्त महसूली विभाग [सर्व].
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, नागपूर.

* श्री. मोहन धारिया, अध्यक्ष, वनराई पुणे व अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जमीन वापर व संधारण मंडळ आणि पडीक जमीन विकास मंडळ.

* महाराष्ट्र राज्य, जमीन धारणा, संधारण व पडीक जमीन विकास परिषदेचे सर्व सभासद.

सचिव, केंद्र शासन, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली.
महसूल व वन विभागाची सर्व कार्यासने.
महसूल व वन विभाग, फ-११ कार्यासन [निवड नस्ती] मंत्रालय, मुंबई.

* पत्राद्वारे.

=====

Scanned by CamScanner

(१२)

ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापन

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र.:-एमएससी/२०००/प्र.क्र.१४३/फ-२
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २६.०९.२००३

वाचावे :- शासन निर्णय क्रमांक एमएससी/२०००/प्र.क्र.१४३/फ-२, दि.२५.०४.२००३

शासन शुध्दीपत्रक :-

शासन निर्णय क्रमांक एमएससी/२०००/प्र.क्र.१४३/फ-२ दि.२५.०४.२००३ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. पृ.१. परिच्छेद १. ओळ क्र.१ मध्ये 'राष्ट्रीय वननिती १९९८' ऐवजी ' राष्ट्रीय वननिती १९८८ 'असे वाचण्यात यावे.

२. पृष्ठ.१. परिच्छेद ४. ओळ क्र.२ 'वनपडीक जमीन (Forest Wet Land)' ऐवजी ' पाणथळ वन जमीन (Forest Wet Land)' असे वाचण्यात यावे.

३. पृष्ठ.९. परिच्छेद ४ 'रोपवन व अवनत/ चांगल्या वनक्षेत्रातील अंतरिम तोडीचे फायदे' या परिच्छेदामध्ये ओळ क्र. ६ नंतर " तथापि चांगल्या वनामधुन इमारती लाकडाचे फायदे हे समितीने कमीत कमी १० वर्ष संरक्षण केल्यानंतर सदर फायदे देण्यात येतील" ही ओळ समाविष्ट करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(अ.ना. त्रिपाठी)
उपसचिव
महसूल व वन विभाग

प्रतिलिपी
१) मा.मुख्य मंत्र्याचे सचिव
२)सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३)मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
[illegible]

Scanned by CamScanner

# सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वनविभाग

(द्वितीय शासन निर्णय)

शासन निर्णयक्रमांक .एम.एस .सी
२०००/प्र. क.१४३/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक २५ एप्रिल २००३

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. :- एमएससी/२०००/प्र.क्र.१४३/फ-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २५.०४.२००३

वाचावे :- १. शासन निर्णय क्रमांक एस.एल.एफ.-१०९१/प्र.क्र.११९/फ-११, दि.१६.३.१९९२
२. शासन निर्णय क्रमांक एफ.डी.एम.-१०९३/प्र.क्र.७/फ-२, दि. ८.७.१९९४
३. केंद्र शासनाचे पत्र क्र. २२.८/२०००-जे एफएम (एफपीडी) दि. ३१.२.२०००
४. केंद्र शासनाचे पत्र क्र. डीओ/२१.१.७/९९/बी-२ दि. ३१.५.२००२

निर्णय :-

राष्ट्रीय वननीती १९९८ अन्वये वनसंरक्षणामध्ये आणि वनविकासासाठी स्थानिक लोकांचा सहभाग अभिप्रेत आहे. त्यानुषंगने केंद्र शासनाच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने सर्व राज्य शासानांना दिनांक १.६.१९९० च्या मार्गदर्शक तत्वान्वये स्थानिक लोकांच्या सहभागाने वनव्यवस्थापन करण्यासाठी एक योजना तयार करावी. अशी सूचना केली होती. केंद्र शासनाच्या सूचनेचा विचार करून महाराष्ट्र शासनाने ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापनेबाबत योजना राबविणेचा निर्णय घेतला आहे.

२. आता क्रेंद शासनाने दिनांक २१.२.२००० व दि. ३१.५.२००२ च्या मार्गदर्शक तत्वांन्वये या कार्यक्रमात चांगली वने घेणे. तसेच स्त्री वर्गाचा जास्त सहभाग प्राप्त करणे. इत्यादी बाबत सुचविले आहे.

सदर मार्गदर्शक तत्वांचा सखोल अभ्यास व विचार करुन राज्य शासनाने पूर्वी निर्गमित केलेले दिनांक १६.३.१९९२ ० ८.७.१९९४ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन या कार्यक्रमाबाबत खालीलप्रमाणे सुधारित निर्णय घेतलेला आहे.

ग्रामीण परिसरातील अपगत व अवनत व वनेतर क्षेत्राचा उपयोग या कार्यक्रमासाठी प्रामुख्याने केला जाईल. तसेच कार्यक्रमांतर्गत वनपडिक (Forest West Land) जमिनीचा सुद्धा अंतर्भाव राहील. सदर कार्यकमामध्ये ४० टक्केच्या वर घनता असलेली वने (यापुढे अशा वनांना चांगली वने असे नमूद करण्यात येईल) ही घेण्यात येतील. सुरुवातीस २ कि.मी अंतराच्या आत ज्या गावचे चांगले वनक्षेत्र आहे, अशा गावांचा प्रायोगिक तत्वांवर या कार्यक्रमामध्ये अशी वने घेण्यासाठी समावेश करण्यात येईल. नंतर टप्प्याटप्प्याने उर्वरित चांगली वने असलेल्या गावांचा विचार सदर कार्यक्रमासाठी करण्यात येईल तथापि संरक्षित क्षेत्रे (राष्ट्रीय उद्याने व अभायारण्ये यांचा समावेश असलेली क्षेत्र)यांचा उपयोग या कार्यक्रमासाठी करता येणार नांही पुढे हे कार्यक्रम स्थानिक ग्रामपंचायतीच्या सहकार्याने राबविले जाणार असून याद्वारे मिळणारे वनोत्पादन स्थानिकांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी अग्रक्रमाने उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यामुळे त्यांच्या हक्कावर बंधने

Scanned by CamScanner

येऊ नये. म्हणून खाजगी व्यक्ती अथवा संस्था तसेच वनोपजांवर आधारित औद्योगिक प्रति करारनाम्यानुसार दिलेले क्षेत्र या कार्यक्रमातून वगळण्यात येईल.

गावाच्या परिसरातील वनेतर क्षेत्र जर मुबलक प्रमाणात उपलब्ध असेल आ वनक्षेत्राशी संलग्न असेल व या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी या वनेतर जमिनीची असेल तर अशा जमिनीचा अंतर्भावही यासाठी करता येईल. तसेच ग्रामस्थांनी व ग्रामपंचाय सहमती दिल्यास गट लागवडीसाठी असलेल्या क्षेत्रात ही योजना राबविता येईल. मात्र संदर्भात ग्रामसंभेमध्ये ठराव घेणे आवश्यक राहील.

स्थानिक नागरिक, स्थानिक स्वराज्यय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि पर्या तज्ञांच्या सहभागाने तथा सहकार्याने क्षेत्रातील नागरी परिसरातील वनक्षेत्र आणि वनेतर प क्षेत्रावरही वनोपजाच्या भागीदारीच्या तरतुदीविना सुधारित रुपामध्ये या कार्यक्रमाची अंमलबजा करत येईल.

या कार्यक्रमाचे एक उद्दिष्ट वनाजवळ राहणाऱ्या ग्रामीणांच्या दैनंदिन वनोत्पादन गरजा भागविणे असे आहे. म्हणून या कार्यक्रमात वनक्षेत्रात वनक्षेत्रात जोड कृषि उत्पादन अ नाही. तथापि मंजूर सूक्ष्मयोजनेतील तरतुदीप्रमाणे अवगत व अपगत वनक्षेत्रात कोरड फलोत्पादनासाठी परवानगी देता येईल. तसेच सदर कार्यक्रमाचे उद्दिष्ट वन तथा वन्यप्रा संवर्धन लोकांच्या सहभागातून अभिप्रेत असल्यामुळे वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या तरतु बाधा येईल असे कोणतेही करारनामे व्यक्ती, संस्था अगर ग्रामपंचायतीशी केले जाणार नाहं

नागरी क्षेत्रात वन आणि वनेतर क्षेत्रावर परिसर विकासाची कामे करण्या उपवनसंरक्षकांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त वन व्यवस्थापन (नागरीक्षेत्र) समितीची स्थापना कर येईल. सदर समितीचे सभासद प्रत्येक लगतच्या वार्डातून २ पेक्षा जास्त राहणार नाहीत. या सदस्यांची संख्या व्यवस्थापनेच्या मर्यादित ठेवण्यात येईल.

केंद्र शासनाने दि. ३१.५.२००२ च्या मार्गदर्शक सुचनान्वये संयुक्त व्यवस्थापन समिती गठन करण्याबाबत काही निर्देश दिले आहेत. केंद्र शासनाने सुचविल्या व राज्यातील परिस्थिती विचारात घेऊन, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण करण्यात आहे. यानुसार संयुक्त वनव्यवस्थापन समितीमध्ये खालीलप्रमाणे दोन समित्या असतील.

१. सर्वसाधारण समिती

२. कार्यकारी समिती

<u>सर्वसाधारण समिती :-</u> मुंबई पंचायत राज अधिनियम १९५९ खाली गठीत ग्रामसभेचे सर्व इच्छूक सदस्य या समितीचे सदस्य राहतील. सर्वसाधारण समितीचे सर्व सदस्य निवडणुक अध्यक्षांची निवड करतील. अध्यक्षांचा कार्यकाल तीन वर्षाचा राहील. अध्यक्षाचे पद हे त्या वर्षी ग्रामसभेमध्ये सरपंचाचे पद ज्या संवर्गासाठी आरक्षित आहे. (मुंबई ग्रामपंचायत अधिनि १९५८ नुसार व महाराष्ट्र अधिनियम क्र. १२१, १९९४) त्याच संवर्गासाठी आरक्षित अ तसेच प्रत्येक संवर्गासाठी महिलांचे आरक्षण हे त्या संवर्गातील संख्येच्या १/३ या प्रम असेल.

<u>कार्यकारी समिती :-</u> कार्यकारी समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

अध्यक्ष :- सर्वसाधारण समितीद्वारे निवडण्यात आलेले अध्यक्ष

Scanned by CamScanner

सदस्य सचिव :- संबंधित क्षेत्राचे वनपाल / वनरक्षक

कोषाध्यक्ष :- सर्वसाधारण समितीमधील सदस्य ज्याची नियुक्ती अध्यक्ष, ग्रामसभेमधील एक वरिष्ठ सदस्य यांच्या सहमतीने सदस्य सचिव करतील.

सदस्य :- संबंधित ग्रामपंचायतीमधील प्रतिनिधी (चक्राकार पद्धतीने)

सदस्य :- सर्वसाधारण समितीमधून निवडणूकीद्वारे नियुक्त ६ सदस्य

नागरी क्षेत्राकरिता सर्वसाधारण समिती :- संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र या करिता मुंबई नागरी क्षेत्र अधिनियम १९५९ प्रमाणे प्रत्येक नगरक्षेत्रातील नागरी क्षेत्रामधील सर्व इच्छुक सदस्य या सर्वसाधारण समितीचे सदस्य राहतील. यातील अध्यक्षांची निवड निवडणूकीद्वारे करण्यात येईल.

नागरी क्षेत्राकरिता कार्यकारी समिती :- संयुक्त वनव्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीच्या कार्यकारी समितीची रचना पुढील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | संबंधित क्षेत्राचे उपवनसंरक्षक | - पदसिद्ध अध्यक्ष |
| २. | जिल्हाधिकारी यांचे कार्यालये /जिल्हा पोलीस यांचे कार्यालय/मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे कार्यालय/महानगरपालिका यांच्या कार्यालयातील एक प्रतिनिधी (वृक्ष अधिकारी) | - सदस्य |
| ३. | या क्षेत्रामध्ये ज्यांचे काही हितसंबंध आहेत (Stake Holder) अश्यापैकी दोन स्त्रिया | - सदस्य |
| ४. | दोन स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी | - सदस्य |
| ५. | संबंधित सहाय्यक वनसंरक्षक/वनक्षेत्रपाल | - सदस्य-सचिव |
| ६. | लगतच्या प्रत्येक वार्डातून - या क्षेत्रामध्ये ज्यांचे काही हितसंबंध आहेत, (Stake Holder) अशापैकी उपवनसंरक्षक यांनी नामनिर्देशित केलेल्या २ व्यक्ती | - सदस्य |

## संयुक्त वनव्यवस्थापन समितीची नोंदणी

संयुक्त वनव्यवस्थापन समितीची नोंदणी :- संयुक्त वनव्यवस्थापन समितीची नोंदणी ही संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या अंतर्गत करण्यात येईल. तसेच संयुक्त वनव्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीची नोंदणी ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० च्या अंतर्गत करण्यात येईल.

## संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे बचत खाते

शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयकृत/सहकारी बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्यकारी

Scanned by CamScanner

ए. आर. शिरसाट

समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव किंवा कोषाध्यक्ष या तिघांपैकी दोघांद्वारे संयुक्तपणे करण्यात येईल. सदर बचत खात्यास सरकारी खाते असे म्हणता येईल.

इतर स्त्रोतांकडून आणि संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नातून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयकृत / सहकारी बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये स्वतंत्ररित्या बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्यकारी समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव वा कोषाध्यक्ष यापैकी दोघे संयुक्तपणे करतील. सदर बचत खात्यांस संयुक्त वनव्यवस्थापन समिती खाते असे म्हणता येईल.

संयुक्त वनव्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीचे बचत खाते

नागरी क्षेत्राकरिता वरीलप्रमाणे सारख्या पद्धतीने प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयकृत/सहकारी बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीच्या नावे बचत खाते उघडण्यात येईल. त्यांचे संचालन सदर समितीच्या अध्यक्षासह सदस्य सचिव हयांचेकडून संयुक्तपणे करण्यात येईल. राज्य शासनाचा निधी, केंद्र शासनाकडून मिळणारा निधी, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपालिका आणि इतर स्त्रोतांकडून प्राप्त होणारी रक्कम सदर खात्यात जमा केली तिचा उपयोग मंजूर सूक्ष्म योजनेनुसार विकास कामांसाठी केला जाईल.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या बैठकी

संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या वर्षातून कमीत-कमी दोन वेळा आमसभा आयोजित करण्यात येतील. कार्यकारी मंडळाची बैठक प्रत्येक महिन्यात कमीत-कमी एकदा घेण्यात येईल. यासाठी आमसभेतीलसर्व सभासदांना ७ दिवसाची पूर्वसूचना देण्यात येईल आणि कार्यकारी समितीच्या सभेसाठी सर्व सदयांना ३ दिवसाची पूर्व सूचना देण्यात येईल. बैठकीचा इतिवृतांतलगेचच विहीत नमुन्यात रजिस्टरमध्ये नोंद करून ठेवण्यात येईल आणि त्यावर अध्यक्ष तथा सदस्य सचिवांची स्वाक्षरी घेतली जाईल. संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या आणि कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची उपस्थिती प्रत्येक बैठकीच्या वेळी नोंदविली जाईल. महत्वाच्या धोरणात्मक बाबी व कार्यकारी मंडळाकडून केलेली कामे याबाबत आमसभेमध्ये चर्चा करण्यात येईल. त्याचप्रमाणे जेव्हा आवश्यकता असेल अशावेळेस आमसभेमध्ये कार्यकारी मंडळाचे सदस्य निवडले जातील. सदर सभेचा इतिवृत्तांत संबंधित वनक्षेत्रपाल यांना पाठविण्यात येईल. कार्यकारी समिती संयुक्त वनव्यवस्थापन समितीतील सदस्यांसंबंधितची मुळ माहिती विहीत नमूण्यात ठेवील. सदर माहितीची नोंदणी पुस्तके सदस्य सचिव यांचे कार्यालयात कायमची ठेवण्यात येतील.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या बैठकीची कार्यवाही सुरु करण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या १/३ संख्या इतकी आणि ५० टक्के स्त्री सदस्य असणे अपेक्षित राहील तसेच कार्यकारी समितीच्या बैठकीचे कामकाज सुरु करण्यासाठी ६ निर्वाचित सदस्य व त्यापैकी २ स्त्री सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे. कार्यकारी समितीच्या बैठकीकरिता सभासदांना ३ दिवसांची पूर्वसूचना देण्यात येईल.

Scanned by CamScanner

संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीच्या बैठकीचे कामकाज सुद्धा वर दिलेल्या पद्धतीप्रमाणे चालविले जाईल. कार्यकारी समितीच्या बैठकीची कार्यवाही सुरु करण्यासाठी ४ सदस्य उपस्थित असणे आवश्यक राहील.

**कार्यक्रमासाठी क्षेत्र निवडणे**

कार्यकारी समितीशी सल्लामसलत करुन संबंधित सहाय्यक वनसंरक्षक, त्या संयुक्त वनव्यवस्थापन समितीला वर्ग करण्यासाठी क्षेत्र निवडतील. ज्या वनखंडाची/सर्व्हे क्रमांकाची सीमा गावापासून ५.० कि.मी. आत आहे. असे वनखंड/सर्व्हे क्रमांक निवडण्यात येतील. गावापासून त्या क्षेत्राचे अंतर, वनसंरक्षणाची समस्या तसेच त्या क्षेत्रापासून मिळणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे या सर्वांचा विचार करुन हे क्षेत्र निवडण्यात येईल आणि उपवनसंरक्षकाच्या मान्यतेनंतर निवडलेले क्षेत्र समितीला वर्ग करण्यात येईल.

संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीच्या कामासाठी क्षेत्राची निवड उपवनसंरक्षक आणि कार्य समितीतील इतर सदस्य यांचेमार्फत संयुक्तपणे करण्यात येईल. यासाठी वने आणि वनालगत किंवा इतर ठिकाणी असलेल्या सार्वजनिक पडिक जमीन, दलदली किंवापाण्याखाली जमिनी जेथे उपलब्ध असतील अशा जमिनी सदर उद्देशासाठी निवडण्यात येतील.

**समझोता समयलेख**

क्षेत्र निवडल्यानंतर या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि संबंधित वनविभागाचे उपवनसंरक्षक, यामध्ये समझोता समयलेख करण्यात येईल. त्याचा कालावधी १० वर्षाकरिता राहील. संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीकरिता निवडलेल्या क्षेत्राकरिता समझोता समयलेखाची आवश्यकता राहणार नाही.

**सुक्ष्म योजना (Micro Plan)**

१. संयुक्त वनव्यवस्थापन समिती वनविभागाच्या सहभागाने या कार्यक्रमाची सुक्ष्म योजना तयार करील. सूक्ष्म योजनेत विहीत असलेली वनसंवर्धन पद्धती प्रचलित कार्य आयोजनेनुसार विहीत करण्यात येईल.

२. वनेतर क्षेत्राकरिता मृदू आणि जलसंधारण आणि वनीकरणाची कार्यप्रणाली मंजूर कार्य आयोजनेनुसार राहील.

३. सूक्ष्म योजनेचा कालावधी १० वर्षाचा राहील.

४. वेळोवेळी सुधारीत भारतीय वनसंवर्धन अधिनियम १९८० याला बाधा येवू नये याचा विचार करुन संयुक्त वनव्यवस्थापन समिती रोपवनासाठी प्रजातीची निवड करतील.

५. जैवविविधता संवर्धन आणि वनौषधी संवर्धन हा सूक्ष्म योजनेचा एक महत्वाचा भाग राहील.

सूक्ष्म योजनेला मान्यता देणाऱ्या समितीचे गठण खालीलप्रमाणे राहील.

Scanned by CamScanner

१. वनसंरक्षक (प्रादेशिक) (दोन्ही वनसंरक्षक यामध्ये जेष्ठ अधिकारी अध्यक्ष राहतील. - अध्यक्ष
२. वनसंरक्षक (कार्य आयोजना) - सदस्य
३. उपवनसंरक्षक (कार्यआयोजना) - सदस्य
४. २ कार्यकारी समितीचे सभासद - सदस्य
५. या क्षेत्रामध्ये ज्यांचे काही हितसंबध आहेत अशा २ व्यक्ती - सदस्य
६. उपवनसंरक्षक (प्रादेशिक) - सदस्य
७. उप संचालक सामाजिक वनीकरण - सदस्य
८. उपवनसंरक्षक (वन्यजीव) - संमिलीत केलेले सदस्य
९. विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित - संमिलीत केलेले सदस्य

सूक्ष्म योजनेतील विभागाच्या मंजूर कार्यआयोजनामध्ये विचलन असेल तर तिच्या अंमलबजावणीपूर्वी ते विचलन सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूर करवून घेतले जाईल. दर पाच वर्षांनी सूक्ष्म योजनेचा आढावा घेतला जाईल. आवश्यक असेल तर वन विभागाच्या मंजूर कार्यआयोजनेवर व वरील समितीच्या मान्यतेने त्यामध्ये बदल करण्यात येतील.

नागरी क्षेत्रासाठी कार्यकारी समितीकडून सूक्ष्म योजना तयार होईल आणि खाली दर्शविलेल्या समितीकडून मंजूरी घेतली जाईल.

१. वनसंरक्षक - अध्यक्ष
२. उपवनसंरक्षक (प्रादेशिक) - सदस्य-सचिव
३. उपवनसंरक्षक कार्यआयोजना - सदस्य
४. उपसंचालक (सामाजिक वनीकरण) - सदस्य
५. दोन स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी - सदस्य
६. या क्षेत्रामध्ये ज्यांचे काही हितसंबंध आहेत Stake Holder) अशापैकी दोन स्त्रिया - सदस्य
७. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका/ नगपालिका कार्यालयातील प्रत्येकी एक सदस्य - सदस्य

सदर तयार केलेल्या सुक्ष्म योजनेच्या तरतुदीमध्ये वनसंवर्धन अधिनियम तथा इतर वन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन होवू नये याबाबत खात्री केली जाईल.

Scanned by CamScanner

**संयुक्त वनव्यवस्थापन समितीतील सदस्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.**

**अ) संरक्षण :-** समितीच्या सभासदांमार्फत वनक्षेत्र व रोपवन क्षेत्राच्या संरक्षणासाठी व्यावहारीक कौशल्य असलेली पद्धत ठरविणे आणि महिन्यातून कमीत कमी एक दिवस पुनरुत्पती व संवर्धनासाठी श्रमदान करणे. सदर क्षेत्रात नियमित गस्त करणे.

**ब) प्रतिबंध (Prevention) :-** वनक्षेत्र व रोपवनक्षेत्र अवैध वृक्षतोड अतिक्रमण, आगी आणि अवैध चराई यापासून नुकसानीबाबत प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे आणि गुन्हेगारांची नावे व तपशील वनधिकाऱ्यास अवगत करणे. भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ वनसंवर्धन अधिनियम १९८० आणि वनाशी संबंधित इतर नियम व अधिनियमाप्रमाणे वनगुन्हयाचे कामी गुन्हेगारास अटक करण्यास, पकडण्यास व कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यासाठी वनधिकाऱ्यांना सहाय्य करणे. त्याचप्रमाणे वनसंवर्धन व वन्यजीव व्यवस्थापनाच्या संदर्भात गुन्हयांचा प्रतिबंध प्रतिबंध, शोध तसेच नियंत्रणामध्ये वनधिकाऱ्यांची मदत करणे.

**क) संयुक्त वनव्यवस्थापन :-** सुक्ष्म योजनेप्रमाणे वर्ग केलेल्या क्षेत्राचे व्यवस्थापन करणे. वनविषयक कामे सुरळीतपणे व वक्तशीरपणे पार पाडण्यास वनअधिकाऱ्याची मदत करणे. संबंधित वनधिकाऱ्यास वनविषयक कामासाठी कामगार मिळविण्यास व वनव्यवस्थापन करण्याकामी त्यांना सहाय्य करणे. वनविभागाने नेमून दिलेली कामे करणे.

ड) जागृती निर्मिती :- ग्रामीण जनतेमध्ये वनांच्या महत्वाविषयी जागृती निर्माण करणे.

इ) उपलब्ध असलेल्या वनोपजाची वाटणी :- वनविभागाला वनउपजाचे निकासी व संग्रहणाचे कामी सहाय्य करणे. संबंधित अधिकाऱ्याला सभासद कार्यकारी समितीने तयार केलेल्या व उपवनसंरक्षक हयांनी मंजूर केलेल्या यादीप्रमाणे वनोपज वाटप करण्यास सहाय्य करणे. वाटप केलेल्या वनोपजाचा कोणत्याही सभासदाकडून दुरुपयोग केला जात नाही हयाची खबरदारी घेणे.

फ) वार्षिक लेखा परिक्षण :- संयुक्त वन व्यवस्थापन समितीला प्राप्त झालेल्या तसेच खर्च केलेल्या रकमेबाबत, लेखापरिक्षण करुन घेण्यासाठी सर्वसाधारण समितीच्या मान्यतेने लेखापरिक्षक नियुक्त करण्यासत येईल. या संदर्भात संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील नियमांच्या अधीन राहून व शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या नियमांना अनुसरुन कार्यपद्धती अवलंबण्यात येईल. लेखापरीक्षकाच्या नियुक्तीबाबत कार्यकारी समिती प्रस्ताव ठेवेल व सर्वसाधारण समिती मान्यता देईल.

Scanned by CamScanner

 ए आर. शिरसाट

**कार्यकारी समितीतीचे कर्तव्ये तथा जबाबदाऱ्या :-**

अ) संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सर्व निर्णयांप्रमाणे व्यवस्थापनेसाठी आणि अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी समिती जबाबदार राहील.

ब) समितीतील सदस्यत्व, वनसंरक्षण, वाद मिटविणे, फायदयाची वाटणी इत्यादीच्या संबंधित सर्व महत्वाच्या विषयावरील कार्यपद्धती संयुंक्त वनव्यवस्थापन समितीच्या सल्ल्याने कार्यकारी समिती ठरवतील.

क) शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचे व इतर सत्रोताच्या व निधीच्या वनविभागाच्या पद्धतीप्रमाणे लेखा व व्यवस्थापनेची जबाबदारीही कार्यकारी समितीची जबाबदारी राहील.

**संयुक्त वनव्यवस्थापन समिती आणि तिच्या सदस्यांना मिळणारे फायदे**

**वर्गीकृत क्षेत्रापासून अकाष्ठ वनोत्पादनाचे फायदे**

समझोता समयलेखावर सही झाल्यानंतर संयुक्त वनव्यवस्थापन समिती आणि तिच्या सभासदांना (Non-Timber Forest Produce) अकाष्ठ वनोत्पादनाचे फायदे उपलब्ध होतील. तथापी जेव्हा एखादी व्यक्ती किंवा कुटुंबाने वनसंरक्षणाच्या योजनेत जेव्हा आवश्यक असेल तेव्हा भाग घेण्यास नकार दिला तर अशा व्यक्तीस अथवा कुटुंबास या योजनेखाली कोणतेही फायदे मिळणार नाहीत. अनुसुचित क्षेत्र वगळून इतर वनक्षेत्रात काही इजा न करता प्रजातीची फळे, फुले, बीज, (काजू वगळून) व पाने (तेंदू व आपटा पाने वगळून) संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सभासदास त्यांच्या घरगुती उपयोगासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समिती ठरविल. त्या सवलतीचे दराने वा त्याप्रमाणात दरवर्षी जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा प्राप्त करता येईल.

| | |
|---|---|
| १) मोहाची फुले | १७) निर्मळ/कपी |
| २) मोहाची फळे | १८) गुग्गळ |
| ३) गोंद | १९) बापची बी |
| ४) हिरडा | २०) कुंचला कारी |
| ५) चारोळी | २१) शिकाकाई |
| ६) आवळा | २२) रिठा |
| ७) नीम बीज | २३) बीब्बा |
| ८) कारंज बीया | २४) गुंज बी |
| ९) बेहळा | २५) ब्रुम ग्रास |
| १०) अमलताश बीया | २६) आंबा बी |
| ११) चिंच | २७) वावडींग |
| १२) चिंचेच्या बिया | २८) बाफळी |
| १३) पळस बिया | २९) कापलेले गवत आणि वैरण |
| १४) कुसुम बिया | ३०) मघ |

Scanned by CamScanner

१५) वानेरंद बिया
१६) ताकाडा/पौंडा
३१) पळसाची पाने
३२) सिताफळ
३३) काजूगर-महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित यांनी केलेली लागवड वगळून

तसेच सभासदांना पुरवठा केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या या वनोत्पदनाची विक्री संयुक्त वनव्यवस्थापन समिती करु शकतील व विक्री किंमत प्राप्त करु शकतील. मात्र अनुसुचित क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अनुसुचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण उत्पादन (व्यापाराचे विनिमय) (सुधारणा) अधिनियम १९९७ याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे.

अनुसुचित क्षेत्रामध्ये (राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य यांचे क्षेत्र वगळून) वरील ३३ वनोपजांची मालकी संबंधित ग्रामपंचायतीची आहे. तथापी ग्रामपंचायतीला वाटल्यास ग्रामसभेमध्ये ठराव पारित करून हया वनोपजाचे संकलन करण्याचे त्या गावाच्या संयुक्त वनव्यवस्थापन समितीला एकावेळी १० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता प्राधिकृत करु शकते. ज्या वनोपजाच्या खरेदीचे अधिकार केवळ महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळाकडेच आहे. त्या वनोपजांची विक्री लाभार्थींना/संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांनी आदिवासी विकास महामंडळास करावी.

<u>रोपवन व अवनत/चांगल्या वनक्षेत्रामधील अंतिम व अंतरिम तोडीचे फायदे :-</u>

संयुक्त वनव्यवस्थापन समितीला त्यांना वर्ग केलेल्या क्षेत्राचे संरक्षण केल्यास त्यातील उत्पादनाबाबत सदस्यांना खालील फायदे मिळणार आहेत.

संयुक्त वनव्यवस्थापन समिती गठित झाली त्यावेळी असलेल्या वृक्षाच्या वाढीबाबत आधारभूत माहितीचा विचार करुन तोडीच्या वेळेपर्यंत आखण्यात आलेली इमारती माल, जळावू लाकूड आणि बांबू यांची झालेली १०० टक्के वाढ (Incremental Volume) या प्रमाणात संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सदस्यांना देण्यांत येईल. समिती गठीत झाली त्यावेळची आधारभूत माहिती उपलब्ध नसेल तर वनसंरक्षक (प्रादेशिक) हे उपवनसंरक्षक (प्रादेशिक) आणि उपवनसंरक्षक (कार्यआयोजना) यांच्या सल्ल्याने ठरवतील. तथापी सदर वनोपजाचे फायदे चांगल्या वनांमध्ये २०% पेक्षा जास्त व अपगत वनांमध्ये ५०% पेक्षा जास्त असणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

<u>नमूद केलेले फायदे संयुक्त वनव्यवस्थापन समितीला खालील पद्धतीप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे मिळतील.</u>

घरगुती गरजाप्रमाणे वनोपज राखून ठेवले जाईल आणि त्या वनोपजाचे वितरण संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सर्व सभासदांना कार्यकारी समिती व वनविभाग यांनी संयुक्तरित्या ठरविलेले मापदंड व दरानुसार वाटप करण्यांत येईल. त्यानंतर राहिलेल्या शिल्लक वनोपजाची विक्री वनविगमार्फत जाहीर लिलावाने करण्यात येईल. त्या लिलावात प्राप्त होणाऱ्या निव्वळ विक्री रक्कमेपैकी (निकासी खर्च, वाहतूक खर्च, आगारावरील व्यवस्थापन खर्च, लिलाव खर्च, विक्रीकर, वनविकास कर, आयकर इ. वजा जाता) ५०% रक्कम संयुक्त वनव्यवस्थापन समितीस रोख

दिली जाईल आणि उर्वरित ५०% रक्कम सुक्ष्म योजनेनुसार वर्ग केलेल्या क्षेत्राच्या विकासाकरिता वनविभागामार्फत खर्च केली जाईल.

सामाजिक वनीकरणाच्या रोपवन तोडीपासून मिळणारे फायदे :-

सामाजिक वनीकरण योजनेतंर्गत घेतलेले गट लागवड क्षेत्र या कार्यक्रमातंर्गत घेतल्यास त्यापासून मिळणारे उत्पन्नाचे वाटप ग्रामपंचायत व शासन यांचेमध्ये ९० टक्के व १० टक्के या प्रमाणात शासनाचे दि. १७ सप्टेंबर १९८२ च्या शासन निर्णयान्वये करण्यात येईल. ग्रामपंचायतीना मिळालेल्या रकमेच्या २५ टक्के रक्कम वनांच्या संरक्षणाच्या कामांवर खर्च करावयाची आहे. याशिवाय एकूण उत्पन्नाच्या ५० टक्के वनोपज स्थानिक जनतेस आरक्षित केले जावे व त्याची बाजारभावाच्या ५० टक्के इतक्या भावाने विक्री भूमिहीन मजूर व दारिद्र रेषेखाली असणाऱ्या व्यक्तींना करावी. उरलेल्या उत्पन्नाची विल्हेवाट लिलावामार्फत केली जाईल आणि हा लिलाव गावातील रहिवाश्यांपुरताच मर्यादित राहील. भूमिहीन मजूर व दारिद्र्य रेषेखाली असलेल्या मजुरांच्या गवताची व सरपणाची गरज किती आहे. याचा अंदाज पद्धतशिररित्या करण्यात यावा. वनोपजाचा पुरवठा गरजेपक्षा कमी पडल्यास त्याचे वाटप गुणवत्तेवर करण्यात यावे.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीला वर्ग केलेल्या क्षेत्रात घडलेल्या वनगुन्हा प्रकरणात संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या साहयाने गुन्हेगार पकडले गेल्यास त्या प्रकरणात गुन्हेगारांपासून प्राप्त झालेल्या नुकसान भरपाई/अर्थदंडाची ५० टक्के पर्यन्त रक्कम संयुक्त वनव्यवस्थापन समितीला देण्यात येईल. अशी जमा झालेली रककम ग्रामविकासावर संयुक्त वनव्यवस्थापन समितीने ठरविल्याप्रमाणे खर्च करण्यात येईल. तसेच गुन्हेगारांकडून अर्थदंडाच्या वसुलीसाठी समितीतील ज्या सभासदांनी प्रत्यक्ष भाग घेतला असेल अशा सभासदांना संयुक्त वनव्यवस्थापन समिती बक्षिस मंजूर करु शकतील.

चराई वरील नियंत्रण :-

संयुक्त वनव्यवस्थापन समितीला वर्ग केलेल्या क्षेत्रात अनियंत्रित चराई करु देता येणार नाही. तथापि जेव्हा अत्यंत आवश्यक असेल तेव्हा काही क्षेत्र कुरण विकासाकरिता वेगळे राखून तेथे संयुक्त वनव्यवस्थापन समितीने निश्चित केलेल्या दरानुसार त्या क्षेत्राच्या वहन क्षमतेपर्यन्तच आवर्तनीय चराईकरिता परवानगी देण्यात येईल आणि इतर क्षेत्राकरिता संयुक्त वनव्यवस्थापन समितीने निश्चित केलेल्या दरानुसार " कापणे आणि नेणे " या तत्वावर गवत नेण्याकरिता परवानगी देण्यात येईल. जे ग्रामस्थ त्यांचे पाळीव गुरांचे खच्चीकरण करुन त्यांना गोठयामध्येच चारा घालतील अशा ग्रामस्थांना संयुक्त वनव्यवस्थापन समितीने निश्चित केल्याप्रमाणे प्रोत्साहन देण्यात येईल.

सदस्यत्वाची बरखास्ती समितीची मान्यता काढणे, अपील इत्यादी :-

अ) संयुक्त वन व्यवस्थापन समितीची मान्यता रद्द करणे :-

संयुक्त वन व्यवस्थापन समिती/कार्यकारी समितीच्या सदस्याने वनांसंबंधी अधिनियम नियम व अन्य तरतुदींचे उल्लंघन केले असेल, तर अशा सभासदाचे सदस्यत्व रद्द करण्याचे अधिकार

Scanned by CamScanner

वनसंरक्षक/मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना राहील परंतु सदस्यत्व रद्द करतांना नैसर्गिक तत्व पालन करण्यात यावे व अशा व्यक्तीला वनोपजाचे कोणतेही फायदे मिळू नयेत अशी दक्षता घेतील. या निर्णयाविरुद्ध अपील करावयाचे झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधी नियमांच्या अधीन प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडे अपील करु शकतील.

ब) १. एखादी संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा त्यांचे सभासद वनासंबंधी अधिमियम किंवा नि याखाली तरतुदीचे वारंवार उल्लंघन करत असल्यास, त्या समितीची मान्यता/नोंदणी रद्द करण्यास मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक) हे संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत कलम नियमांच्या नोंदणी रद्द करण्याबाबत निबंधक यांना शिफारस करतील.

२. किंवा संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सर्वसाधारण समितीच्या बैठकीमध्ये ३/५ सदस्यांच्या बहुमताने ठराव मान्य झाल्यास, संस्था नोंदणी अधिनियमाच्या नियम १३ १४ च्या अधीन राहून संस्थेचे विसर्जन (Dissolution) करता येऊ शकेल.

वाद मिटविणे

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या सदर शासन निर्णयान्वये अंमलबजावण करताना कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास, त्याबाबतचा निर्णय संस्था नोंदणी अधिनिय १८६० च्या नियमांच्या अधीन राहून निर्णय घेण्यात येईल.

नियमांमध्ये सुधारणा करणे

संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या उप अधिनियमांमध्ये काही सुधारणा करावयाची झाल्यास त्याबाबतचा निर्णय, समितीच्या सभेमध्ये ३/५ बहुमताद्वारे व संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या नियमानुसार तसेच राज्य शासन व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांच्या अधीन राहू त्याप्रमाणे करण्यात येईल.

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील निरीक्षण व मार्गदर्शनाकरिता राज्यस्तरीय सुकाणू समिती :-

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करताना उद्‌भवणारे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी व संयुक्त वन व्यवस्थापन समित्या सुरळीतपणे काम करतील याची खात्री करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली पुढे नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| १. प्रधान मुख्य वनसंरक्षक | - | अध्यक्ष |
| २. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (विकास) | - | सदस्य |
| ३. अपर प्रधान मुख्य मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) | - | सदस्य |
| ४. मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) | - | सदस्य |
| ५. मुख्य वनसंरक्षण (मुल्यांकन) | - | सदस्य |
| ६. मुख्य वनसंरक्षक (धोरण वन व्यवस्थापन) | - | सदस्य |
| ७. उपवनसंरक्षक (संयुक्त वन व्यवस्थापन) | - | सदस्य सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

अ. ना. त्रिपाठी
उपसचिव
महसुल व वन विभाग

प्रतिलिपी

१. मा. मुख्य मंत्र्याचे सचिव.
२) सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
४) महाराष्ट्रशासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे प्रधान सचिव व सचिव.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
९) मुख्य वनसंरक्षक (सर्व)
१०) सर्व विभागीय आयुक्त.
११) वनसंरक्षक (सर्व)
१२) जिल्हाधिकारी (सर्व)
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
१४) प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
१५) उपवनसंरक्षक (सर्व)
१६) जिल्हा विकास अधिकारी (सर्व) जिल्हा कृषि अधिकारी/मृदसंधारण अधिकारी (सर्व)
१७) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व) जिल्हा आदिवासी कल्याण आधिकारी (सर्व) जिल्हा उद्योग अधिकारी (सर्व)
१८) जिल्हा सार्वजनिक आरोग्य अधिकारी.
१९) सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (वन कक्ष)
२०) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

Scanned by CamScanner

# सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वनविभाग

# संत तुकाराम वनग्राम योजना

शासन निर्णयक्रमांक .एफ.डी.एम
२००५/प्र. क.३१३/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक २३ नोव्हेंबर २००६

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २००५/प्र.क्र.३१३/फ-२**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२,**
**दिनांक २३.११.२००६**

वाचा :- शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग क्रमांक एमएससी-२०००/प्र.क्र.१४
फ-२, दि. २५.४.२००३.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय वननिती १९८८ नुसार वनसंरक्षण आणि वनविकासामध्ये स्थानिक लोक सहभाग अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने स्था लोकांच्या सहभागाने वन व्यवस्थापन करण्यासाठी एक योजना तयार करण्याबाबत राज्य शासन सुचित केले केले होते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून महाराष्ट्र शासाने २५.०४.२००३ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन ही यो राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेनुसार वन क्षेत्रामध्ये व वनक्षेत्राच्या सीमेवर असणा सुमारे १५५०० गावांपैकी आजपर्यंत ११७९९ एवढया गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्था समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

या समित्यांनी वनांचे संरक्षण करणे व अवैध वृक्षतोड, वनक्षेत्रातील अतिक्रमण, वनवण अवैध चराई इत्यादींस प्रतिबंध करणे अपेक्षित आहे. तसेच त्यांच्यावर त्यांचेकडे वर्ग केले वनांचे व्यवस्थापन करणे, गामीण जनतेमध्ये वनांच्या महत्वाविषयी जागृती निर्माण करणे यासा कामे करणे, हे सदर शासन निर्णयात विषद केल्याप्रमाणे संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे अ कर्तव्य आहे व त्यात सतत सुधारणा घडवून आणण्याचा दृष्टिकोनातून त्या समित्यांत एक च निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी राज्यस्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या समित्यांना पारितोषिक जा करणे शासनाच्या विचाराधीन होते.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियाना अंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा अशी योजना पूर्वी पासून अंमलात आणण्य आली आहे. त्या धर्तीवर वन विभागामध्ये एक योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचारा होती. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पामध्ये तशी घोषणाही करण्यात आली आहे. त अनुसरुन योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

Scanned by CamScanner

ए. आर. शिरसाट

**शासन निर्णय :-**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगाच्या माध्यमातून वने व वन्यजीव यांचे महत्व पटवून देणाऱ्या महान संत तुकाराम महाराज यांच्या नावाने संत तुकाराम वनग्राम योजना दरवर्षी राबविण्यात येईल. या योजनेतील ज्या संयुक्त वनव्यवस्थापन समित्या सहभागी होतील त्यांच्यामधून

१. जिल्हा स्तरावरील उत्कृष्ट ठरणाऱ्या गुणानुक्रमे पहिल्या ३ समित्यांना , व

२. राज्यस्तरावरील उत्कृष्ट ठरणाऱ्या गुणानुक्रमे पहिल्या ३ समित्यांना संत तुकाराम महाराजांच्या नावाने संत तुकाराम वनग्राम उत्कृष्ट संयुक्त वनव्यवस्थापन समिती पुरस्कार रोख स्वरुपात बक्षिसे देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येईल.

**योजनेची अंमलबजावणी**

**अ) योजनेस प्रसिद्धी देणे**

या योजनेची सुरुवात सन २००६-०७ पासून होईल. त्यापूर्वी प्रसार माध्यमामध्ये या योजनेस व्यापक पूर्व प्रसिद्धी देण्यात येईल. तसेच क्षेत्रिय स्तरावरील वन अधिकारी/कर्मचारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन करतील. ज्या गावामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीची अद्याप स्थापना झालेली नाही त्यांना अशी समिती स्थापना करण्यास प्रवृत्त करतील.

**ब) संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची निवड करणे.**

१. वन परिक्षेत्र स्तरावरील मुल्यमापन समिती डिसेंबर महिन्यात संबंधित वनक्षेत्रांना भेटी देवून संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या कामाची तपासणी करुन ३ उत्कृष्ट समित्यांची नावे सदर पुरस्कारासाठी विभागीय वन अधिकाऱ्यामार्फत जिल्हा स्तरावरील निवड समितीकडे प्रस्तावित करेल.

२. वरीलप्रमाणे प्रस्तावित समित्या संबंधी आवश्यक ती तपासणी करुन व आवश्यक असल्यास कामाची पाहणी करुन जिल्हा स्तरावर पुरस्कार देण्याकरिता प्रत्येक जिल्हयातील ३ समित्यांची नावे जिल्हा स्तरावरील निवड समितीकडून जाहीर करण्यात येतील.

३. राज्यस्तरीय मुल्यमापन समिती जिल्हा स्तरावरील प्रथम बक्षीस प्राप्त समित्यांपैकी ३ समित्यांची निवड फेब्रुवारी महिनत पूर्ण करेल. व त्यामधील प्रथम तीन समित्यांची राज्यस्तरीय बक्षिसासाठी निवड करेल.

क) मुल्यमापन समित्यांचे गठन :-

वर उल्लेखित समित्यांचे गठन खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

१) वनपरिक्षेत्र स्तरावरील निवड समिती :-

१) वनक्षेत्र ज्यांचे कार्यक्षेत्रात येते ते उपविभागीय अधिकारी (महसूल) - अध्यक्ष

२) सहायक वनसंरक्षक संबंधित क्षेत्र - उपाध्यक्ष

Scanned by CamScanner

३) तहसीलदार

४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती - सदस्य

५) पोलीस निरीक्षक - सदस्य

६) संबंधित क्षेत्राचे नजिकचे वृक्ष लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण - सदस्य

७) तालुका कृषी अधिकारी

८) वानिकीशी निगडीत दोन सेवाभावी संस्थेचे सदस्य (वार्षिक आधारावर चक्राकार पद्धतीने) - सदस्य

९) संबंधित क्षेत्राचे नजिकचे वनपरिक्षेत्र अधिकारी (संबंधित वनक्षेत्र) -सदस्य स

३. जिल्हा स्तरावरील निवड समिती :-

१) संबंधित जिल्हाधिकारी - अध्यक्ष

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य

३) जिल्हा पोलीस अधिक्षक - सदस्य

उप ४) ~~स~~ संचालक, सामाजिक वनीकरण विभाग - सदस्य

५) जिल्हा अधिक्षक कृषी विभाग - सदस्य

६) वानिकी क्षेत्राशी निगडीत एक सेवाभावी संस्थेचे सदस्य (वार्षिक आधारावर चक्राकार पद्धतीने) - २ सदस्य

७) संबंधित जिल्हयातील उप वनसंरक्षक (प्रा)/उपविभागीय वन अधिकारी (योजना) - सदस्य स

४. राज्य स्तरावरील निवड समिती :-

१) मा. मंत्री (वने) - अध्यक्ष

२) मा. राज्यमंत्री (वने) - उपाध्यक्ष

३) प्रधान सचिव (वने) - सदस्य

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर - सदस्य

५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर - सदस्य

६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर (अर्थसंकल्प व नियोजन व विकास) - सदस्य

७) अशासकीय सदस्य (यांची निवड मा. मंत्री (वने) हे वार्षिक चक्राकार पद्धतीने करतील) - सदस्य

८) वनसंरक्षक (संयुक्त वन व्यवस्थापन) - सदस्य स

ड. बक्षिस वितरण :-

वरील प्रमाणे निवडण्यात आलेल्या

१. जिल्हास्तरीय बक्षीसपात्र संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचा निकाल जिल्हया मुख्यालयांच्या ठिकाणी जाहीर करण्यात येईल व त्यानंतर त्याच ठिकाणी बक्षीस वित समारंभ आयोजित करण्यात येईल.

Scanned by CamScanner

२. राज्यस्तरीय बक्षीसपात्र समित्यांचा निकाल शासन स्तरावर जाहीर करण्यात येईल व समारंभपूर्वक त्यांना २१ मार्च रोजी जागतिक वन दिनाच्या कार्यक्रमामध्ये गौरविण्यात येईल.

१. जिल्हा स्तरावरील बक्षिस समारंभ :-

जिल्हा स्तरावरील गुणानुक्रमे ३ उत्कृष्ट संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना संत तुकाराम वनग्राम उत्कृष्ट जिल्हास्तरीय संयुक्त वन व्यवस्थापन समिती पारितोषिक प्रदान करण्यात येईल. पारितोषिकाची रक्कम खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | : रु. २५,०००/- | 51,000 /- |
| द्वितीय क्रमांकाचे बक्षीस | : रु. १५०००/- | 31,000 /- |
| तृतीय क्रमांकाचे बक्षीस | : रु. ७५००/- | 11,000 /- |

३. राज्य स्तरावरील बक्षीस समारंभ :-

राज्य स्तरावरील गुणानुक्रमे ३ उत्कृष्ट संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना संत तुकाराम वनग्राम उत्कृष्ट राज्यस्तरीय संयुक्त वन व्यवस्थापन समिती पारितोषिक प्रदान करण्यात येईल. पारितोषिकाची रक्कम पुढील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | : रु. १०,००,०००/- |
| द्वितीय क्रमांकाचे बक्षीस | : रु. ५,००,०००/- |
| तृतीय क्रमांकाचे बक्षीस | : रु. ३,००,०००/- |

फ) योजनेत सहभागी होण्याबाबतचे नियम :-

१. ज्या संयुक्त वन व्यवस्थापन समित्या संत तुकाराम वन ग्राम योजनेत सक्रीय सहभागी होतील त्याच समित्या निवडीस व बक्षिसास पात्र ठरतील.

२. ज्या गावामध्ये अद्याप संयुक्त वन व्यवस्थापन समितीची स्थापना झालेली नाही परंतु त्या गावाची स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असल्यास योजनेची सुरुवात झाल्यापासून एका महिन्याच्या आत त्या गावामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीची स्थापना करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा समित्यांनी पुढील वर्षी स्पर्धेत सहभागी व्हावे.

३. बक्षिसपात्र ठरण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समितीने किमान ५० गुण मिळविणे आवश्यक राहील.

४. प्रत्येक स्तरावरील मुल्यमापन समितीने दिलेला निर्णय हा अंतिम असेल व त्याबाबतचा कोणत्याही स्तरावर अपील करता येणार नाही.

५. सदर योजनेचे स्वरुप, वेळापत्रक, सहभागी होण्याच्या अटी व शर्ती, बक्षीसांच्या रकमा, इत्यादी मध्ये वेळोवेळी बदल/सुधारण करण्याचे अधिकार शासनास असतील.

Scanned by CamScanner

६. संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्याचे मुल्यमापन ज्या बाबींच्या आधारे करावयाचे आहे त्याचा व त्यासाठी द्यावयाचे गुण याचा तपशील सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आला आहे.

७. बक्षीस प्राप्त समित्या पुढील वर्षी वरील स्तरावरील स्पर्धेत भाग घेवू शकतील परंतु राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार प्राप्त समिती पुढील ५ वर्षे स्पर्धेत सहभागी होवू शकणार नाही.

८. प्रथम फेरीत बक्षीस प्राप्त झालेली संयुक्त वन व्यवस्थापन समिती जर पुढील फेरीतील बक्षीसास पात्र ठरली तर प्रथम प्राप्त बक्षीसाची रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम देण्यात येईल.

ग) <u>बक्षीस रकमेचा विनियोग :-</u>

समितीस प्राप्त होणाऱ्या बक्षीसाची रक्कम ही समितीच्या नावे अस्तित्वात असलेल्या बचत खात्यात जमा करण्यात येईल आणि तिचा उपयोग मंजूर सूक्ष्म योजेनुसार वन विकास कामासाठी केला जाईल.

या योजनेबाबत होणारा खर्च, महसूल व वन विभाग मागणी क्र.सी-७/२४०६ वनीकरण व वन्यजीव १०१, वनसंधारण व विकास, पंचवार्षिक योजनांगर्तत योजना (११) (१०) ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम (२४०६, १५२१) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक-२८३/०६/व्यय-१०, दिनांक १३.११.२००६ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(म. द. जाधव)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मा. मंत्री, मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
मुख्य वनसंरक्षक (सर्व)/वनसंरक्षक (सर्व)
सर्व विभागीय आयुक्त
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय,
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय,

Scanned by CamScanner

## संत तुकाराम वनग्राम अभियान योजनेसाठी मूल्यांकन प्रपत्र

### संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे नांव :-

वनविभागाचे नांव :-

| अ. नं. | कसोटीचे नांव | कमाल गुण | श्रेणीकरिता संमर्थन | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| १. | वनीकरण | १० | | |
| २. | मृद व जलसंधारण | १० | | |
| ३. | वनसंरक्षण | १० | | |
| ४. | वनवणवा प्रतिबंधक उपाय | ०५ | | |
| ५. | वनक्षेत्रावरील अतिक्रमणास प्रतिबंध | ०५ | | |
| ६. | वनामध्ये अवैध चराईस प्रतिबंध | ०५ | | |
| ७. | वन्य पशू पक्षी संरक्षण | ०५ | | |
| ८. | वन्य पशू, पक्षी यांना पाणवठा उपलब्ध करुन देणे | ०५ | | |
| ९. | श्रमदान | ०५ | | |
| १०. | कार्यक्रमामधील जनतेचा सहभाग | ०५ | | |
| ११. | स्त्रियांचा सहभाग | ०५ | | |
| १२. | वनेतर पर्यायी इंधनाचा वापर | ०५ | | |
| १३. | निधीचा विनियोग | ०५ | | |
| १४. | अभिलेख (रेकॉर्ड ठेवणे) | ०५ | | |
| १५. | नवसंकल्पना | ०५ | | |
| १६. | जनजागृती | ०५ | | |
| १७. | विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती | ०५ | | |
| | एकूण | | | |

वरील श्रेणीशिवाय मूल्यांकन अधिकाऱ्याने सुमारे १० ओळीत साध्याबाबत वर्णनात्मक खुलासा करावा.

Scanned by CamScanner

# सयुंक्त वनव्यवस्थापन समिती

## महाराष्ट्र शासन

## महसूल व वनविभाग

(प्रथम शासन निर्णय)

शासन निर्णयक्रमांक .एफ.डी.एम
२०११/प्र. क.१००/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक ५ ऑक्टोबर २०११

Scanned by CamScanner

संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बळकटीकरण व
ग्रामसभेला जोडणे तसेच वनक्षेत्रात असलेल्या गड
किल्ल्यांचे जतन करणे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २०११/प्र.क्र.१००/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक ०५ ऑक्टोबर २०११

वाचा :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एमएससी/२०००/प्र.क्र. १४३/फ-२. दि. २५.४.२००३.

२) महसूल व वन विभाग, शासन शुद्धपत्रक क्र. एमएससी/२०००/प्र.क्र. १४३/फ-२. दि. २६.९.२००३.

३) केंद्रिय पर्यावरण व वन विभागाचे पत्र क्र.डी.ओ.नं.१-५० एमओएस(आय/सी)ई ॲण्ड एफ/१०, दि. २९.१०.२०१०

प्रस्तावना :-

राष्ट्रीय वननीती, १९८८ अन्वये वनसंरक्षण आणि वनविकासासाठी स्थानिक लोकांचा सहभाग अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. या सुचनांप्रमाणे महाराष्ट्र शासनाने दि. १६ मार्च १९९२ चा शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यामध्ये दि. २५.०४.२००३ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली होती. दि. २५.०४.२००३ च्या शासन निर्णयामध्ये ग्रामिणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण परिसरातील अपगत व वनेतर उपयोग या कार्यक्रमासाठी करण्याबाबत तसेच कार्यक्रमांतर्गत वनपडिक जमिनीचा सुद्धा आणि ४० टक्केच्या वन घनता असलेली वने (चांगली वने) यांचा अंतर्भाव करुन संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्थापन करुन त्यामध्ये सर्वसाधारण समिती व कार्यकारी समितीचा अंतर्भाव केला होता. सदरहू शासन निर्णयामध्ये सर्वसाधारण समिती व कार्यकारी समितीची रचना संयुक्त वन व्यवस्थापन समितीची नोंदणी, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बचत खाते, संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या बैठका, कार्यक्रमासाठी क्षेत्राची निवड, क्षेत्र निवडीनंतर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी समझोता समन्वय (Memorandum of Understanding) सूक्ष्म योजना (Micro Plan) सुक्ष्म योजनांना मान्यता देणाऱ्या समितीचे गठन, संयुक्त वन व्यवस्थापन समितीतील सदस्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, समिती आणि सदस्यांना मिळणारे फायदे, रोपवन व

Scanned by CamScanner

अवनत/चांगल्या वनक्षेत्रातील अंतिम व अंतरिम फायदे, चराईवरील नियंत्रण, सदस्यत्वाची बरखास्ती, समितीची मान्यता काढणे, अपील इत्यादी., संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील निरीक्षण व मार्गदर्शनाकरिता राज्यस्तरीय सुकाणू समिती इत्यादी बाबतचा ऊहापोह केलेला आहे.

केंद्रीय वन मंत्रालयाने त्यांच्या दि. २९.१०.२०१० च्या पत्रान्वये पंचायत (अनुसूचित क्षेत्रात विस्तारीत) अधिनियम, १९९६ लक्षात घेऊन संयुक्त वन व्यवस्थापन समित्या ग्रामसभेच्या अखत्यारित आणण्याबाबत काही सूचना दिलेल्या असून सदरहू सुचनेच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे वन हक्क अधिनियम अमलात आल्यामुळे संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यक्रमामध्ये बदल करणे आवश्यक असल्यामुळे संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बळकटीकरण व ग्रामसभेला जोडण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याशिवाय वन पर्यटन वाढत असले तरी वनक्षेत्रातील किल्ले व निसर्गरम्य ठिकाणांवर कोणाचेहीनियंत्रण नसल्यामुळे ना-दुरुस्त झालेले असल्यामुळे व सर्व परिसरामध्ये पर्यटकांकडून कचरा टाकण्यात येत असल्यामुळे त्यांचे रक्षण व संवर्धन होणे आवश्यक आहे. म्हणून वनक्षेत्रावरील बांबूवरील अधिकार आणि जलस्त्रोत, प्रपात, पाणवठे, गड, किल्ले इत्यादी आकर्षक असणाऱ्या पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांवर नियमन या बाबी देखील ग्रामसभा व त्या अंतर्गत स्थापन होणाऱ्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडे देण्याचे देखील विचाराधीन होते.

## शासन निर्णय :-

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन दि. २५.०४.२००३ च्या शासन निर्णयातील ज्या बाबी या शासन निर्णयान्वये चालू ठेवण्यांत आल्या आहेत अश्या बाबी वगळून उर्वरित बाबी अधिक्रमित करुन या कार्यक्रमाबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

### १) संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे उद्दिष्टये, समितीचे गठण, कर्तव्ये व जबाबदाऱ्या, समितीला होणारे फायदे, वनक्षेत्रामधील अंतिम व अंतरिम तोडीचे फायदे, संयुक्त वन व्यवस्थावपन समितीची वा समिती सदस्यत्वाची मान्यता रद्द करणे, राज्य पातळीवरील समिती याबाबतचे धोरण :-

१) उद्दिष्टये :-

* देशाच्या वनांचे शाश्वत संरक्षण, संवर्धन आणि व्यवस्थापन या माध्यमातून गावाचा सर्वांगिण विकास साधणे.

* वनांचे सुयोग्य संरक्षण व व्यवस्थापन करुन त्यांना उत्पादक घटक म्हणून विकसीत करणे व त्याकरिता पोषक असे व्यवस्थापन गाव समाजाच्या सहभागातून साध्य करणे.

Scanned by CamScanner

* वने जास्त असलेल्या भागात वन हाच विकासाचा मुख्य आधार बनेल व त्यातून भागाचा शाश्वत विकास साधेल यासाठी प्रयत्न करणे.
* ग्रामीण आणि आदिवासींची प्रामुख्याने जळण, चारा, लहान इमारती लाकूड जीवनावश्यक वनोपज व रोजंगाराची गरज भागेल असे वन व वनेत्तर जमिनी नियोजन त्यांच्या सहभागातून साध्य करणे.
* कार्य आयोजना आणि वानिकी मानक/मापदंड विचारात घेऊन बांबूसह गौण वन उपज व्यवस्थापन, संवर्धन व गावाच्या विकासासाठी त्याचा उपयोग करणे.
* वन पर्यटनस्थळांची माहिती पर्यटकांना देणे, वनसंवर्धन व्यवस्थापन करणे.

२. कार्यक्रमांतर्गत निवड करावयाचे वनक्षेत्रे :-

ग्रामीण परिसरातील अपगत व अवनत वनक्षेत्र व वनेतर क्षेत्राचा (राष्ट्रीय उद्याने व अभयार सोडून) उपयोग या कार्यक्रमासाठी प्रामुख्याने केला जाईल. सदर कार्यक्रमामध्ये ४० टक्केच्या घनता असेलेली वने (यापुढे अशा वनांना चांगली वने असे नमूद करण्यात येईल) सुद्धा घेण्या येतील.

३) संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण :-

सदर समिती मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४९ अंतर्गत असलेल तरतुदीस अनुसरुन राहील. या समितीची रचना याच अधिनियमातील कलम ४९ मधील कलम १,२,३,४ नुसार राहील. व त्यास वन संवर्धन आणि विकासाकरिता संयुक्त व व्यवस्थापन समिती असे संबोधता येईल. या समितीची निमिर्ती ग्रामसभा करील. या समिती कालावधी पंचायतीच्या कालावधीशी सुसंगत राहील. या समितीचे अधिकार, कार्यव्याप याबाबत ग्रामसभेने पंचायतीशी सल्लामसलत करुन निश्चित करावयाचा आहे. व त्याचप्रमा या समितीच्या कामकाजावर पंचायतीच्या नियंत्रणाखाली ग्रामसभेने देखरेख आणि कार्यपद्धती नियमन करणेचे आहे. या समितीमध्ये १२ आणि कमाल २४ अशी सदस्य संख्या असेल. सदस्यापैकी १/३ पेक्षा कमी नाही असे सदस्य पंचायतीमधील राहतील आणि निम्याहून कमी महिलांची संख्या नसेल. या व्यतिरिक्त शासनाने निर्देश दिल्यानुसार अनुसुचित जाती, अनुसुचि

Scanned by CamScanner

जमाती, विमुक्त आणि भटक्या जमाती यांनाही प्रतिनिधीत्व अनिवार्य असेल. महिला सदस्यांची नियुक्ती करताना गाव पातळीवरील महिला ग्राम सभेने केलेली शिफारस विचारात घेणे आवश्यक असेल. अशारितीने स्थापन करण्यात येणाऱ्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा ठराव ग्रामसभा पारित करुन स्थानिक वनक्षेत्रपाल यांना पाठवेल. शासनाचे वतीने संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे पदसिद्ध सदस्य सचिव वनपाल/वनरक्षक हे कार्य करतील. सर्वसाधारणपणे ज्या गावाची लोकसंख्या १००० पेक्षा अधिक असेल तेथे वनपाल सदस्य सचिव राहतील. ज्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण दि. २५.०४.२००३ च्या शासन निर्णयाच्या कार्यपद्धतीनुसार करण्यात आले आहे. अशा समितीचा कार्यकाळ समाप्तीनंतर वर उल्लेखित कार्यपद्धतीप्रमाणे नवीन संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण करण्यात येईल. अशाप्रकारे नवीन संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण होईपर्यंत पूर्वीची समिती कार्यरत राहील. परंतु जुन्या समितीस ग्रामसभेची मंजुरी घेणे अनिवार्य राहील. असे केल्यास सुरु असलेले काम विस्कळीत होणार नाहीत.

आदिवासी क्षेत्रामध्ये ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये वस्ती/पाडे असतील तर प्रत्येक वस्ती/पाडे यांची स्वतंत्र संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्यांच्या ग्रामसभेमधून करावी. व त्यामध्ये वस्ती/पाडे यामधील लोक सदस्य म्हणून पात्र राहतील.

४) समितीला द्यावयाच्या वनक्षेत्राची निवड :-

वनपरिक्षेत्र अधिकारी समितीचे सभासद व कार्यकारी समितीचे यादीसह अहवाल, उपवनसंरक्षक यांचेकडे पाठवतील. उपवनसंरक्षक त्यांचेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन संबंधित सहायक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी व संयुक्त वन व्यवस्थापन समितीशी सल्लामसलत करुन समितीकरिता वन व वनेतर क्षेत्राची निवड करतील. समितीला द्यावयाच्या क्षेत्राची निवडकरताना सभासदांची संख्या, वनाची उत्पादन क्षमता वनक्षेत्रातील पर्यटन स्थळे व तत्सम ठिकाणे इत्यादींचा विचार करुन क्षेत्राची निवड केली जाईल. सर्वसाधारणपणे गावठाणापासून ३ कि. मी. पर्यन्तचे क्षेत्र समितीचे व्यवस्थापनाकरिता निवडण्यात यावे. एकापेक्षा अधिक गावे असल्यास दोन गावांच्या मध्यभागापासून ग्रामस्थांच्या सहकार्याने क्षेत्र अंतिमतः निश्चित केले जाईल.

Scanned by CamScanner

५) **समझोता समयलेख :-**

समितीचे क्षेत्र निवडल्यानंतर व नोंदणी केल्यानंतर विहित प्रपत्रामध्ये उपवनसंरक्षक (प्रा.) संयुक्त वनव्यवस्थापन समिती यांचेमध्ये समझोता समयलेख करण्यात येईल. तसेच यापूर्वी झाले समझोता समयलेखाचा कार्यकाळ समाप्त झाला असेल तर अशा समितीचे नवीन समझोता समयले वरील पद्धतीप्रमाणे करता येईल. समितीची नोंद झाल्यापासून १ महिन्याचे आत सुधा समझोता समयलेख तयार करण्यात येईल. या प्रस्तावानुसार समझोता समयलेख याम यथानुरुप बदल करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख यांचे स्तरावर नि घेण्यात येईल.

६) **सूक्ष्म योजना :-**

वन, वन्यजीव व जैवविविधता यांचा अविभाज्य संबंध असल्याने संयुक्त वन व्यवस्था समिती वनविभागाच्या सहभागाने वनाचे संरक्षण, वन्यजीवांचे व जैव विविधतेचे संरक्षण, संव मृद व जलसंधारण, गावविकास, रोजगार निमिर्ती आणि उत्पन्न वाढीबाबत योजना या सर्व बाबीं विचार करुन सुक्ष्म योजना तयार करेल. प्रामुख्याने वनक्षेत्रावर अवलंबत्व कमी करणे, सुधा चुली, बायोगॅस व तत्सम साधनांचा वापर, घरगोठा व त्याच्याशी निगडीत चारा निमिर्ती, पर्य स्थळांची देखभाल तथा मार्गदर्शक नियुक्ती, बांबू समुपयोजन इत्यादी बाबींचा अंतर्भाव असेल

वनालगतच्या क्षेत्राजवळील शेतकरी/कास्तकार वंश परंपरेनुसार ढोबळमानाने निश्चि करण्यात आलेल्या वनक्षेत्रातूनच आपल्या दैनंदिन गरजा भागवितो. यास्तव अशा क्षेत्राचे संरक्ष करण्याची जबाबदारी त्याच कास्तकारास संयुक्त वन व्यवस्थापन समितीने दिल्यास चराई/वण चोरटी तोड/अतिक्रमण यासारखे गुन्हे आटोक्यात आणण्याचे काम प्रभावीपणे होईल. या बाबीं भर देण्याकरिता अशा कास्तकाराकरिता प्रोत्साहनात्मक योजना राबविण्याचा सामावेश सू आराखडयात असेल.

वरील सुक्ष्म योजनेमध्ये वनाचे व्यवस्थापन, कार्य आयोजनाच्या तत्वप्रणालीनुस असेल. त्यामध्ये वनसंवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत तरतुदी व इतर संबंधि कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. वनक्षेत्रावर समिती स योजना समितीशी सल्लामसलत करुन उपवनसंरक्षक (प्रा.) यांचेकडे सादर करेल सूक्ष्म योजना प्राप्त झाल्यानंतर उपवनसंरक्षक (प्रा.) योजनेची छाननी करुन सुक्ष्म योजनेस मंजुरी देऊन संयुक्त वन व्यवस्थापन समितीस कळवितील. सूक्ष्म

Scanned by CamScanner

योजना समझोता समयलेख तयार झाल्यानंतर पुढील २ महिन्यात तयार करण्याची जबाबदारी संबंधित उपवनसंरक्षक (प्रा.) यांची राहील.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्यांच्या सदस्यांना गुरांच्या चराईसाठी शुल्क आकारु शकेल तसेच जे सदस्य गावाच्या सुक्ष्म योजनेची अंमलबजावणी करणार नाहीत जसे जे सदस्य अनधिकृतरित्या वृक्षतोड, चराई आणि अतिक्रमण करतील तसेच वनातील संरक्षामध्ये सहभागी होणार नाहीत अशा सदस्यांना संयुक्त वन व्यवस्थापन समिती दंड आकारु शकेल किंवा त्या सदस्यांना गौण वन उपजांच्या फायद्यापासून वंचित ठेवण्यात येईल.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे बचत खाते :-

शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयीकृत/सहकारी बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्यकारी समितीचे अध्यक्ष व सदस्य-सचिव दोघांद्वारे संयुक्तपणे करण्यात येईल. सदर बचत खात्यास सरकारी खाते असे म्हणावे. या खात्यांतर्गत होणाऱ्या निधिच्या विनियोगास उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे स्तरावर मंजुरी घेतली जाईल.

वार्षिक लेखा परिक्षण :-

संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सरकारी खात्याचे राज्य वन विकास यंत्रणा (SFDA) करिता शासनाने प्रचलित केलेली लेखापरिक्षण पद्धतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

इतर स्त्रोताकडून आणि समितीच्या स्वतःच्या उत्पन्नातून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयकृत बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये स्वतंत्ररित्या बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन अध्यक्ष व कोषाध्यक्ष किंवा कार्यकारीणीतील एक सदस्य संयुक्तपणे करतील. सदर बचत खात्यास संयुक्त वनव्यवस्थापन समिती खाते असे म्हणावे. सदरहू खात्यातील निधिच्या विनियोगास ग्रामपंचायतीच्या आम सभेअंतर्गत मंजुरी घेतली जाईल.

८. संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे कर्तव्य व जबाबदाऱ्या :-

१. वनाचे, वन्यजीवांचे व जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन संयुक्तपणे करणे.
२. वन गुन्हयांवर नियंत्रण ठेवण्याकरिता वन अधिकाऱ्यांसोबत सहकार्य करणे.
३. सुक्ष्म योजनेची योग्यरितीने अंमलबजावणी करणे.

Scanned by CamScanner

<u>योजना समझोता समयलेख तयार झाल्यानंतर पुढील २ महिन्यात तयार करण्याची जबाबदा संबंधित उपवनसंरक्षक (प्रा.) यांची राहील.</u>

संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्यांच्या सदस्यांना गुरांच्या चराईसाठी शुल्क आ शकेल तसेच जे सदस्य गावाच्या सुक्ष्म योजनेची अंमलबजावणी करणार नाहीत जसे जे स अनधिकृतरित्या वृक्षतोड, चराई आणि अतिक्रमण करतील तसेच वनातील संरक्षामध्ये सह होणार नाहीत अशा सदस्यांना संयुक्त वन व्यवस्थापन समिती दंड आकारु शकेल किंवा सदस्यांना गौण वन उपजांच्या फायद्यापासून वंचित ठेवण्यात येईल.

<u>संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे बचत खाते :-</u>

शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयीकृत/सहकारी किंवा पोस्ट ऑफिसमध्ये संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्य समितीचे अध्यक्ष व सदस्य-सचिव दोघांद्वारे संयुक्तपणे करण्यात येईल. सदर बचत खात <u>सरकारी खाते</u> असे म्हणावे. या खात्यांतर्गत होणाऱ्या निधिच्या विनियोगास उपवनसंरक्षक (प्रादेशि यांचे स्तरावर मंजुरी घेतली जाईल.

<u>वार्षिक लेखा परिक्षण :-</u>

संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सरकारी खात्याचे राज्य वन विकास यंत्रणा (SFD करिता शासनाने प्रचलित केलेली लेखापरिक्षण पद्धतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

इतर स्त्रोताकडून आणि समितीच्या स्वतःच्या उत्पन्नातून प्राप्त होणाऱ्या निधी व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयकृत बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये स्वतंत्ररित्या बचत खाते उघड येईल. सदर खात्याचे संचालन अध्यक्ष व कोषाध्यक्ष किंवा कार्यकारीणीतील एक सदस्य संयुक्त करतील. सदर बचत खात्यास <u>संयुक्त वनव्यवस्थापन समिती खाते</u> असे म्हणावे. सदरहू खात्या निधिच्या विनियोगास ग्रामपंचायतीच्या आम सभेअंतर्गत मंजुरी घेतली जाईल.

८. <u>संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे कर्तव्य व जबाबदाऱ्या :-</u>

१. वनाचे, वन्यजीवांचे व जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन संयुक्तपणे करणे.
२. वन गुन्हयांवर नियंत्रण ठेवण्याकरिता वन अधिकाऱ्यांसोबत सहकार्य करणे.
३. सुक्ष्म योजनेची योग्यरितीने अंमलबजावणी करणे.

Scanned by CamScanner

४. इतर विभागांशी समन्वय साधून ग्राम विकासाच्या योजना आखणे व राबविणे.

५. संयुक्त वन व्यवस्थापन समितीला वर्ग केलेल्या वनक्षेत्रात निसर्ग पर्यटनाच्या कामाला चालना देणे करिता राज्याच्या निसर्ग पर्यटन धोरणानुसार योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे. यामध्ये स्थानिक पर्यटन स्थळांचा त्यांचा -हास न होता विकास करणे, यामधून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे व त्या स्थळाचे महत्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोंचविणे याची दखल घेतली जाईल.

६. वनक्षेत्रातील प्रेक्षणीय स्थळे तसेच गड, किल्ले, घबघबे, कुंड इ. ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांकडून उपद्रव शुल्क व प्रवेश शुल्क वसुलीचे अधिकार समितीस राहतील. जेणेकरुन पर्यटन स्थळाची स्वच्छता, पावित्र्य व निसर्ग समतोल साधता येईल.

७. अवैध वृक्षतोड, चराई, वणवा, शिकार अशा प्रकरणी समितीने दंडनिहाय कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

वरीलप्रमाणे समितीने त्यांचे कर्तव्य व जबाबदारी पार पाडल्याबद्दल वनपरिक्षेत्र अधिकारी व वनव्यवस्थापन समिती संयुक्तपणे मूल्यांकन करुन दरवर्षी (वित्तीय वर्ष) उपवनसंरक्षक (प्रा.) यांचेकडे अहवाल सादर करेल.

९. <u>संयुक्त वन व्यवस्थापन समितीस वनोपजाचे फायदे :-</u>

अ) अकाष्ठ वनोपज

सूक्ष्म योजना तयार झाल्यानंतर वनाला कुठल्याही प्रकारची इजा न करता व कार्यआयोजनेच्या तरतुदींचा भंग न करता समितीचे सदस्यांना घरगुती उपयोगासाठी अकाष्ठ वनोपज (तेंदू व आपटा पाने वगळून) समितीनी ठरविलेल्या सवलतीच्या दराने मिळेल. तसेच सभासदांना पुरवठा केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या या वनोत्पादनाची विक्री संयुक्त वन व्यवस्थापन समिती करेल. यामधून प्राप्त झालेल्या उत्पन्नाची रक्कम संयुक्त वनव्यवस्थापन समिती <u>खात्यामध्ये</u> जमा करण्यात येईल. याशिवाय बांबू/गवत सारखे अकाष्ठ वनोपज वनसंवर्धन दृष्टया उपलब्ध असल्यास त्याचा कार्य आयोजनेतील तरतुदीनुसार लाभ घेता येईल.

Scanned by CamScanner

अनुसुचित क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अनुसुचित क्षेत्रातील गौण उत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ अन्वये ग्रामसभेला गौण वन उपजाची मालकी हस्तांतरीत करण्यात आली असल्याने संयुक्त वन व्यवस्थापन समिती अकाष्ठ वनोत्पादन गोळा करण्यापूर्वी ग्रामसभेच्या ठरावाद्वारे त्याची परवानगी घेईल त्याचप्रमाणे महाराष्ट्र अनुसुचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण महाराष्ट्र गौण उत्पादन (व्यापाराचे विनियम) (सुधारणा) अधिनियम, १९९७ व महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तीची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम, १९७६ चे अनुपालन करण्यात यावे.

अशाच प्रकारे वनाचे व्यवस्थापन करीत असताना क्षमतेपेक्षा जास्त वनोपजाचे निष्कासन झाल्यास सदर वनोपजाचे पुनरुत्पादन होईपावेतो सदरहू अधिकार त्या कालावधीपर्यंत स्थगित ठेवण्याचे अधिकार स्थानिक वनक्षेत्रपालाचे शिफारशीवरुन उपवनसंरक्षक (प्रा.) यांना राहतील.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती कोणत्याही वन्यप्राणी अभयारण्य, राष्ट्रीय उद्याने व व्याघ्र प्रकल्प यामध्ये असतील तर त्या समितीचे नामकरण इको डेव्हलपमेंट समिती असे राहील व त्या समितीला देण्यात येणाऱ्या फायदयामध्ये कोणत्याही वनातील काष्ट, अकाष्ट वन उपजाचे फायदे देण्यात येणार नाहीत. परंतु इतर संयुक्त वन व्यवस्थापन समितीला जे अधिकार आहेत ते या समितीला देण्यात येतील.

ब) <u>वनक्षेत्रातील अंतिम व अंतरिम तोडीचे फायदे :-</u>

संयुक्त वन व्यवसथापन समितीला त्यांना वर्ग केलेल्या क्षेत्रामध्ये कार्यआयोजनाप्रमाणे मिळालेल्या उत्पादनातील चांगल्या वनामध्ये <u>२० टक्के पर्यंत</u> व अपगत / अवनत वनामध्ये <u>५० टक्केपर्यंत</u> वाटा खालील नमूद केल्याप्रमाणे मिळू शकेल. समितीने <u>५ वर्ष</u> वनाचे संरक्षण व संवर्धनाबाबत नमूद केलेले कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर समिती असे फायदे मिळण्यास पात्र ठरेल. अपगत व अवनत वनक्षेत्रात बांबू उत्पादनाचे फायदे समिती गठित झाल्यानंतर, ३ वर्षे बांबूंचे संरक्षण व संवर्धन केल्यासच मिळतील. मात्र चांगल्या जंगलामध्ये कार्य आयोजनेनुसार बांबू तोडण्यास उपलब्ध असेल त्या बांबुंचे निष्कासन समिती समझोता समयलेख झाल्यापासून पात्र ठरेल. समितीला वर्ग करण्यात आलेल्या वनांमध्ये कर्ययोजनेमध्ये विशद केल्यानुसार बांबूचे शास्त्रोक्त पद्धतीने निष्कासन करण्यात येईल. असे केल्याने वनांपासून बांबूचे उत्पादन समितीला निरंतर पद्धतीने मिळत राहील.

Scanned by CamScanner

समितीला पात्र ठरविण्याची प्रक्रिया वनाधिकारी, संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांची वन परिक्षेत्र पातळीवरील संयुक्त समिती करेल. उपवनसंरक्षक ही संयुक्त समिती गठीत करतील व त्यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल मुख्य वनसंरक्षकांना सादर करतील. मात्र ठरविलेल्या त्यांना वर्ग केलेल्या क्षेत्रामधील अंतिम व अंतरिम तोडीचे समितील सर्व फायदे व उत्पादनातील वाटा स्थापनेच्या पांचव्या वर्षापासून मिळेल. वनोपजाच्या लिलावापासून प्राप्त होणाऱ्या रकमेतून विक्रीकर व आयकर इत्यादी वजा जाता अनुज्ञेय रकमेच्या चांगल्या वनात २०% आणि अपगत व अवनत वनात ५०% रक्कम संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या खात्यात जमा केली जाईल व उर्वरित ५० टक्के रक्कम समितीच्या सरकारी खात्यात जमा करण्यात येईल. या रकमेचा वापर सुक्ष्म योजनेनुसार वन विकासाकरिता व गाव विकासाकरिता केला जाईल. सर्वसाधारणपणे या रकमेचा विनियोग वनक्षेत्रावर स्थानिकांच्या दैनंदिन गरजा भागविण्याकरिता पडणारा ताण कमी करण्यासाठी आखलेल्या उपाययोजनेसाठी केला जाईल.

क) <u>वनक्षेत्रात असलेली निसर्गरम्य ठिकाणे व गड-किल्ले संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यक्षेत्रात आणणे.</u>

संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे कार्यक्षेत्रातील क्षेत्र निसर्ग पर्यटनाकरिता विकासित करुन, जर पर्यटकांना आकर्षित करता आले तर पर्यटनापासून मिळणारे प्रवेश शुल्क, कॅमेरा शुल्क असे उत्पन्न संयुक्त वन व्यवस्थापन समितीला मिळेल. प्रवेश फी इत्यादी, संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडून निर्णय होऊन निश्चित केली जाईल. तथापि सरकारी यंत्रणा किंवा सरकारच्या वतीने सदर ठिकाणी काम करणाऱ्या व्यक्तींना अशा क्षेत्रात प्रवेश फी, इत्यादीची सूट राहील. पर्यटन स्थळाचा ऱ्हास होऊ नये यास्तव संयुक्त वन व्यवस्थापन समिती प्रशिक्षित मार्गदर्शकाच्या सेवा उपलब्ध करुन देईल व त्यायोगे या मार्गदर्शक युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. हे मार्गदर्शक शुल्क निश्चितीचे अधिकार संयुक्त वन व्यवस्थापन समिती इतर शुल्काप्रमाणे निश्चित करेल. पर्यटकांकडून मिळणारे शुल्क हे समिती खात्यामध्ये भरण्यात येईल.

Scanned by CamScanner

जी संयुक्त वन व्यवस्थापन समिती किल्ल्याकडे जाणाऱ्या पाऊलवाटेची स्वच्छता, देखभाल करण्याची जबाबदारी घेईल. त्या समितीस राज्याच्या निसर्ग पर्यटन योजनेतून अनुदान देण्यात येईल. वन विभागांच्या अधिकाऱ्यासोबत सदर समिती खालीलप्रमाणे कामे करतील.

१. सर्व किल्ल्यावर जाण्याचे पारंपारिक मार्ग खुणांनी दर्शविण्यात येतील.

२. किल्ल्यावर जाण्याचे प्राचीन मार्ग वापरायोग्य / सुस्थितीत ठेवतील.

३. किल्ल्यावर पिण्याचे पाणी / स्वच्छतागृहांची व्यवस्था ठेवतील.

तसेच जुनी विश्रामगृहे असल्यास चालू स्थितीत ठेवणे व पुरातत्व विभागास आवश्यक त्या सुधारण करण्यास वन संवर्धन कायद्याच्या अधीन राहून परवानगी देणे ही कामे वन विभागामार्फत करण्यात येतील.

ड) **शुल्काचा वापर :-**

पर्यटकाकडून मिळणारे शुल्क हे पर्यटन स्थळाची साफसफाई , संरक्षण, माहिती फलक लावणे व पर्यटकासाठी गाईड म्हणून नेमणूक करण्याकरिता वापरण्यात येईल.

इ) **पात्र समित्यांना उपलब्ध असणारे फायदे :-**

सदर धोरण जाहीर होण्यापूर्वी दि. १६.०३.१९९२ व दि. २५.०४.१००३ शासन निर्णयानुसार पात्र समित्यांना जे फायदे अनुज्ञेय आहेत ते फायदे सदर पात्र समित्यांना उपलब्ध राहतील. पात्र ठरविण्यासाठी वनपरिक्षेत्र स्तरावर उपवनसंरक्षक यांचे अध्यक्षतेखाली सहायक वनसंरक्षक, संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, आणि २ संयुक्त वनव्यवस्थापन समिती सभासद यांची समिती गठीत करण्यात येईल. सदर बैठक परिक्षेत्रातच घेणे बंधनकारक राहील. रोपवन व अवनत वनक्षेत्रामधील अंतरिम तोडीचे फायदे प्रत्यक्षात झालेल्या तोडीप्रमाणे संयुक्त वन व्यवस्थापन समितीला देण्यात यावा. वनसंबंधी सर्व कामे संबंधित वनविभागाच्या मंजूर कार्य योजनेप्रमाणेच वन समितीमार्फतच करावी. जिथे जंगल कामगार सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र नसेल त्या गावात कुपांची कामे समितीला द्यावीत. सदर समितीच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या उत्पादनावरील ७ टक्के कर उपवनसंरक्षक जिल्हा परिषदेला देतील व हा वाटा जिल्हा परिषद समितीला देतील. (CAMPA) व १३ व्या वित्त आयोगामधून अवनत वनक्षेत्र (Degraded

Scanned by CamScanner

Forest) वनीकरणाचा कार्यक्रम हा संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत अंमलबजावणी करण्याचे नियोजन वन विभाग करेल. तसेच शासनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी आणि शासनाने दिलेली कामे करण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समिती शासनास मनुष्यबळ पुरवेल.

१०) संयुक्त वन व्यवस्थापन समितीची /सदस्याची मान्यता रद्द करणे :-

संयुक्त वन व्यवस्थापन समितीने त्यांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या विशेषतः कार्य आयोजनेच्या तरतुदींचे पालन योग्य रितीने हाताळण्यात हयगय केल्यास उपवनसंरक्षक (प्रा.) ही समिती बरखास्त करु शकतील. सदस्यांची सदस्यता रद्द करण्याचा निर्णय संयुक्त वन व्यवस्थापन समिती घेईल. हे करताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन करण्यात येईल.

अपील :-

समिती / सदस्याची सदस्यता भंग झाल्यानंतर एक महिन्याच्या आत समिती / सदस्य मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांचेकडे अपील करु शकतील. मुख्य वनसंरक्षक यांचा निर्णय हा अंतिम राहील.

राज्य पातळीवर समिती :-

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमांच्या अंमलबजावणी करतांना उदभवणारे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी व संयुक्त वन व्यवस्थापन समित्या सुरळीतपणे काम करतील यांची खात्री करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली पुढे नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत आहे.

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य - अध्यक्ष
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) - सदस्य
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन, विकास) - सदस्य
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) - सदस्य
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज, संनियंत्रण व मुल्यांकन) - सदस्य
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (तंत्रज्ञान व धोरण) - सदस्य
७. समितीमधून निवड केलेले ३ महिला प्रतिनिधी - सदस्य
पुरुष प्रतिनिधी ७, स्वयंसेवी संस्थेचे २ प्रतिनिधी
८. मुख्य वनसंरक्षक (संयुक्त वन व्यवस्थापन/नियोजन व विकास) - सदस्य-सचिव

Scanned by CamScanner

१०) अंमलबजावणी प्रक्रिया (IMPLEMENTATION MECHANISM

संयुक्त वन समिती मार्फत वनक्षेत्राचा गैरवापर होऊ नये म्हणून त्यांना अ[illegible] वेळी काही महत्वाच्या अटी व शर्ती लावण्यात येतील तसेच योग्यप्रकारे वनांचे [illegible] केल्यास आकर्षक बक्षिस योजना राबविण्यात येईल.

सदर शासन निर्णय हा ग्रामविकास विभाग, आदिवासी विकास विभाग, वित्त विभाग[illegible] सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. संगणक संकेतांक - २०१११०१००४३४[illegible] असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(प्रविणसिंह परदेश)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शास[illegible]

१) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
२) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
३) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
८) महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक
१०) सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक/उप वनसंरक्षक
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) १/२, महाराष्ट्र मुंबई/[illegible]
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६) प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा (सर्व)
१७) जिल्हा विकास अधिकारी (सर्व), जिल्हा कृषी अधिकारी/मृद संधारण अधिका[illegible]
१९) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व), जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी (सर्व[illegible] उद्योग अधिकारी (सर्व)
२०) जिल्हा सार्वजनिक आरोग्य अधिकारी (सर्व)
२१) सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (वनकक्ष)
२२) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, [illegible]

Scanned by CamScanner

# सयुंक्त वनव्यवस्थापन समिति

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वनविभाग

## एल.पी.जी.गैस वाटप शासन निर्णय

शासन निर्णयक्रमांक .एम.डी.एम
२०१२/प्र. क.४/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक १० जूलै २०१२

Scanned by CamScanner

संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना/ग्रामस्थांना सवलतीच्या दराने बायोगॅस/स्वयंपाक गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबाबतची योजना

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. :- एमडीएम २०१२//प्र.क्र.४/फ-२

मंत्रालय, मुंबई-४०००३२,

दिनांक १० जुलै २०१२

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एफडीएम-२०११/ प्र.क्र.१००/फ-२, दि. ०५.१०.२०११.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एफडीएम-२०११/ प्र.क्र.१०४/फ-२, दि. २५.१०.२०११.

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एफडीएम-२०११/ प्र.क्र.१००/फ-२, दि. २२.१२.२०११.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात एकूण वनक्षेत्र ६१,९३९ कि. मी. असून वनालगत असलेल्या गावांची संख्या जवळपास १५,५०० एवढी आहे. वनालगतच्या गावात राहणारे लोक विशेषतः आदिवासी व मागासवर्गीय आहेत. ते जळावू लाकडासाठी वनावर अवलंबून आहेत. जळावू लाकडासाठी बहुतांश नव्याने आलेल्या फटव्यांची तोड केली जात असल्यामुळे नैसर्गिक पुनर्उत्पत्तीवर त्याचा विपरित परिणाम होतो व वनाची घनता कमी होते. तसेच स्वयंपाकासाठी लाकडांचा वापर केल्यामुळे निर्माण होणाऱ्या धुरामुळे महिलांचे आरोग्यावर देखील वाईट परिणाम होतो.

२. वनाच्या संरक्षणार्थ लोकांचा सहभाग घेण्याच्या दृष्टीकोनातून राज्यात १९९२ पासून ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. राज्यात आता पर्यन्त जवळपास १२,६०० संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापित झालेल्या आहेत. सदर कार्यक्रमास चालना देण्यासाठी संदर्भ १ वरील दिनांक ५.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या बळकटीकरणाबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच समितीच्या कार्यक्षेत्रातून जिल्हा परिषदेस पात्र होणाऱ्या वन महसूलाच्या ७ % अनुदान जिल्हा परिषदेद्वारे संबंधित समित्यांना गावांच्या विकासाकरिता देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

३. राष्ट्रीय वननिती, १९८८ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राज्यात ३३ % वनाच्छदानाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रयत्न म्हणून राज्यात १०० कोटी वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या अभिनव उपक्रमात इतर विभागाचा सहभाग प्राप्त व्हावा म्हणून याबाबत संदर्भ २ वरील दिनांक २५.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये विविध विभागांना उद्दिष्टांचे वाटप करण्यात आलेले आहे. आणि यापूर्वी देखील मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आली असली तरी गुरेचराई, वनात

Scanned by CamScanner

लागणाऱ्या आगी, वनातून जळावू लाकडासाठी होणाऱ्या तोडीमुळे वृक्ष लागवडीस अपेक्षेप्रमाणे यश प्राप्त होऊ शकले नाही.

४. संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम /परिस्थितीकी विकास कार्यक्रमाची (ECO Development Programme) अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भ ३ वरील दि. २२.१२.२०११ च्या शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना सवलतीच्या दराने बायोगॅस, स्वयंपाक गॅस, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षणाकरिता प्रोत्साहन अनुदान देण्याचे नमूद केले आहे. याशिवाय शासनाने इतर राज्यातून येणाऱ्या जनावरांच्या वनक्षेत्रावरील चराई बंदी घालण्याचा निर्णय घेतलेला आहे. या चराई बंदीमुळे रोपांचे जिवंत टक्केवारीमध्ये वाढ होऊन नैसर्गिक पुनर्उत्पादन वाढीस पोषक वातावरण निर्माण होईल. म्हणून याबाबत विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

५. वनक्षेत्रावरील जळाऊ लाकडाच्या तोडीमुळे वनावर होणारे दुष्परिणाम कमी होण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन सदस्यांना/ग्रामस्थांना सवलतीच्या दराने बायोगॅस/स्वयंपाक गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

(अ) समितीची निवड :-

संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना/ग्रामस्थांना सवलतीच्या दराने बायोगॅस/ स्वयंपाक गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या निवडीसाठी खालील मापदंड वापरण्यात येतील. :-

निकष :-

१) समितींना वर्ग करण्यात आलेल्या वनक्षेत्रात चराईबंदी व कुऱ्हाडबंदी अंमलबजावणी करीत असलेली समिती. फक्त जी संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्यांचेकडे वर्ग केलेल्या जंगलात गवत कापून लिलाव करतील किंवा गवत शेतकऱ्यांना वितरित करतील अशी समिती.

२) समितींना वर्ग केलेल्या वनक्षेत्राची आगीपासून संरक्षण करण्यासाठी सक्रियरित्या सहभाग देणारी समिती. मागचे वर्षी २ हेक्टर पेक्षा जास्त जळालेले नाही व लागलेली आग संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी आग विझवली अशी समिती.

Scanned by CamScanner

३) समितींना वर्ग केलेल्या वनक्षेत्राची अतिक्रमणापासून संरक्षण करणारी समिती तसेच वन्य प्राण्यांच्या शिकारीस व अवैध वृक्षतोडीस प्रतिबंध करणारी समिती.
४) गेल्या वर्षात एकही नवीन अतिक्रमण नाही अशी समिती.

ज्या संयुक्त वन व्यवस्थापन समिती वन्यप्राणी व वनाच्या संरक्षणासाठी प्रवृत्त आहेत अशा समितीची निवड करण्यात यावी. समित्यांची निवड करताना त्यांनी मागील कालावधीत केलेल्या कामांचा विचार करण्यात येईल. तसेच ज्या समित्यांना संत तुकाराम वनग्राम योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर/राज्यस्तरावर बक्षीस प्राप्त झाले आहेत. अशा गावांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

हे निकष पूर्ण करणाऱ्या गावांची शिफारस संबंधित उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी करतील व मुख्य वनसंरक्षक उपलब्ध निधी विचारात घेऊन निकष पूर्ण करणाऱ्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा विचार करतील.

(ब) लाभार्थींची निवड :-

वर नमूद पद्धतीस अनुसरुन निवड करण्यात आलेल्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना/ग्रामस्थांना या योजनेचा लाभ मिळू शकेल. सदर योजनेअंतर्गत त्या लाभार्थ्यांच्या निवडीकरिता संयुक्त वन व्यवस्थापन समितीस शिफारस करील. व त्यास ग्रामसभेची मान्यता घेईल. गोठयातून जनावरांना चारा देणाऱ्या सदस्यांची निवड करण्यात येईल. बायोगॅसचे लाभार्थ्यांची निवड करताना समिती संबंधितांकडे जनावरांची आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध असल्याची खात्री करतील. दुभती जनावरांचे अनुदान प्राप्त होणेकरिता किमान चार भाकड जनावर विकल्यानंतर तसे प्रमाणपत्र स्थानिक पशू संवर्धन अधिकारी यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. जे सदस्य त्यांना नेमून दिलेल्या वृक्षांचे संगोपन करणार नाहीत व समितीने दिलेल्या अटींची पूर्तता करणार नाही, अशा सदस्यांना/ग्रामस्थांना दिलेले लाभ रद्द करण्याचा संयुक्त वन व्यवस्थापन समितीला अधिकार राहील. लाभार्थ्यांची निवड संयुक्त वन व्यवस्थापन समितीनी केल्यानंतर ग्रामसभेची मान्यता घेण्यात येईल. उपलब्ध अनुदानापेक्षा लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्यास लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात येईल.

(क) योजनेंतर्गत खर्च व अनुदान :-

१) सदर योजनेंतर्गत मंजूर करण्यात येणारे अनुदान संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या संयुक्त खात्यात जमा करण्यात येईल.

२) एलपीजी गॅस कनेक्शन :- ज्या कुटुंबामध्ये पाळीव जनावरे नसल्यामुळे शेण उपलब्ध नाही, अशा कुटुंबांना एलपीजी गॅस कनेक्शन देण्यात येईल. पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षी अनुक्रमे १२, ८, ६ व ४ याप्रमाणे गॅस सिलेंडर देण्यात येतील. गॅस कनेक्शनसाठी एकूण रु.

Scanned by CamScanner

४०९०/- इतका खर्च असून पहिल्या वर्षासाठी १२ सिलेंडरकरिता रु. ४९२०/- इतका खर्च येणार आहे. गॅस सिलेंडर विकत घेतल्यानंतर रक्कम संबंधित गॅस एजन्सीला संयुक्त वन व्यवस्थापन समिती मार्फत देण्यात येतील. याबाबत ७५ % रक्कम शासनाकडून अनुदान देण्यात येईल व २५% रक्कम लाभार्थ्यांने भरणे आवश्यक आहे.

३) <u>बायोगॅस प्लान्ट पुरवठा :-</u> ज्या कुटुंबात किमान चार पाळीव गाई किंवा म्हशी असतील त्यांना शासनाकडून अनुदान तत्वावर २ घन मी. बायोगॅस (प्रचलित निकषाप्रमाणे एका बायोगॅस प्लान्टची किंमत रु. १६,०००/- आहे.) यासाठी शासनाकडून ७५% अनुदान देण्यात येईल. व लाभार्थ्याचा हिस्सा २५% राहील.

४) <u>दुभत्या जनावरांसाठी अनुदान :-</u> किमान ४ भाकड अनुत्पादक जनावरे विकायला तयार असल्यास अशा कुटुंबांना चार भाकड/अनुत्पादक गाई विकल्यावर एक चांगल्या प्रतीची संकरित गाय रुपये ४०,०००/- व चार भाकड/अनुत्पादक बैल विकल्यास त्या बदल्यात दोन चांगल्या प्रतीचे बैल किंमत रु. ३५,०००/- उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाकडून ५०% अनुदान तत्वावर योजना राबविण्यात येईल. व उर्वरित ५०% खर्च लाभार्थ्यांनी करावयाचा आहे.

५) <u>वृक्ष लागवडीच्या संरक्षणाकरिता प्रोत्साहन :-</u> ज्या गावात किमान ५० हेक्टर शासकीय क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आली असेल अशा क्षेत्रांना संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्या क्षेत्रावरील लोकांना रोपांचे संरक्षणाचे काम कुटुंबनिहाय/क्षेत्रनिहाय ठरविण्यात येईल. सदर कुटुंबांनी पांच वर्षापर्यंत यशस्वीरित्या रोपांची देखभाल केल्यास व त्यातील ९५% रोपे पाचव्या वर्षाअखेर जिवंत राहिल्यास कुटुंबाला रोपे लागवडीच्या दुसऱ्या वर्षापासून पाचव्या वर्षापर्यन्त प्रतीमाह रोप ५० पैसे (अक्षरी पन्नास पैसे फक्त) एवढे देण्यात येतील. प्रत्येक कुटुंबाने किमान १०० वृक्ष लागवडीची देखभाल करणे आवश्यक आहे. वृक्ष लागवडीबाबत संबंधित वनक्षेत्रपाल व बी.डी.ओ. यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. <u>रोपसंरक्षणात NREGS आणि पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेत लावलेल्या झाडांना प्राधान्य देण्यात येईल.</u>

६) अनुसुचित जमाती लाभार्थीच्या कुटुंबावर येणारा खर्च आदिवासी उपयोजनेतून, अनुसुचित जाती लाभार्थीच्या कुटुंबावर अनु. जाती उपयोजनेंतर्गत अनुदानातून तसेच सर्वसाधारण कुटुंबासाठीचा खर्च जिल्हा परिषदेला देण्यात येत असलेल्या ७ टक्के वन विकास कराच्या अनुदानांतर्गत जिल्हा परिषदेकडून उपलब्ध अनुदानातून व १३ वा वित्त आयोग व कॅम्पा मधून केलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल. ७ टक्के वनविकास कराची रक्कम खर्च करताना संबंधित जिल्हा परिषदेची सहमती घेण्यात यावी.

७) <u>अनुदानाचे वितरण</u> :- उपरोक्त योजना राबविताना संबंधित वनविभागाचे उपवनसंरक्षक हे संबंधित योजनेबाबतचे अनुदान संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यामध्ये ३ टप्प्यामध्ये जमा करतील व संयुक्त वन व्यवस्थापन समिती संबंधित लाभार्थ्यांना सदरहू अनुदान उपलब्ध करुन

Scanned by CamScanner

देईल. याकरिता प्रत्येक वन विभागासाठी उपवनसंरक्षक /विभागीय वन अधिकारी प्रस्ताव तयार करतील. प्रस्ताव मान्य झाल्यानंतर संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सरकारी खात्यामध्ये प्रस्तावाचे ३० टक्के निधी जमा करतील. उर्वरित निधी संबंधित वनक्षेत्रपाल व बी.डी.ओ. यांनी या योजनेची व्यवस्थितरित्या अंमलबजावणी होत आहे असे प्रमाणित केल्यानंतर दोन टप्प्यात जमा करतील. अनुसुचित जमातीच्या लाभार्थींच्या बाबतीत खर्चाची माहिती प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास यांचेकडे तर अनुसुचित जातीच्या लाभार्थींच्या बाबतीत खर्चाची माहिती सहायक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे पाठविण्यात येईल.

८) या कार्यक्रमासाठी लागणारा निधी अनुसुचित जमातीच्या कुटुंबांकरिता अनुसुचित जमाती उपयोजना, अनुसुचित जातीच्या कुटुंबाकरिता अनुसुचित जाती उपयोजना व सर्व साधारण कुटुंबांकरिता वन विभागास मिळणाऱ्या ७% वन विकास करामधून भागविण्यात येईल. तसेच यापेक्षा जास्त येणारा खर्च संयुक्त वन व्यवस्थापन समितीला देण्यात येणाऱ्या अनुदानातून व कॅम्पा आणि १३ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून भागविण्यात येईल. दरवर्षी १३ व्या वित्त आयोगाच्या व कॅम्पाच्या आराखडयामध्ये असलेली संयुक्त वन व्यवस्थापन समितीसाठी केलेली तरतूद हया कार्यक्रमासाठी खर्च करण्यात यावी.

(ड) योजनेच्या अटी व शर्ती :-

१) वरील परिच्छेद ५ (अ) मध्ये नमूद बार्बीची पुर्तता करीत असलेली संयुक्त वन व्यवस्थापन समितीची गावेच या योजनेसाठी पात्र ठरतील.

२) लाभार्थी कुटुंबास एलपीजी गॅस/बायोगॅस प्लान्ट युनिट अथवा त्यांना देण्यात आलेली दुभती जनावरे विकता येणार नाहीत. तसे केल्यास संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करतील.

सदर शासन निर्णय हा ग्रामविकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, नियोजन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०७१३१११०७०३०३०३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(नं. मा. शिलवंत)

उपसचिव,

महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल महोदयांचे सचिव.

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

Scanned by CamScanner

शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २०१२/प्र.क्र.४/फ-२
दिनांक : १० जुलै २०१२

## संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना/ग्रामस्थांना सवलतीच्या दराने बायोगॅस/स्वयंपाक गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबाबतची योजना

### * निकष :

१) चराईबंदी व कुऱ्हाडबंदी करणारी समिती
२) वनक्षेत्राची आगीपासून संरक्षण करण्यासाठी सक्रियरित्या सहभाग देणारी समिती
३) अतिक्रमणापासून संरक्षणास मदत करणारी समिती
४) वनप्राण्यांची शिकार व अवैध वृक्ष तोडीस प्रतिबंध करणारी समिती
५) वनक्षेत्रात नविन अतिक्रमण नाही अशी समिती
६) संत तुकाराम वनग्राम योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर/राज्यस्तरावर बक्षिसप्राप्त मान्यता

### * लाभार्थीची निवड :-

लाभार्थीची निवड संयुक्त वनव्यवस्थापन समितीची शिफारस व ग्रामसभेची मान्यता

### * योजनेअंतर्गत खर्च व अनुदान :-

१) योजनेअंतर्गत मंजुर अनुदान संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या खात्यात जमा करण्यात येईल.
२) एल.पी.जी.गॅस कनेक्शन (लाभार्थी २५% शासन ७५%)
३) बायोगॅस प्लॉट पुरवठा (लाभार्थी २५% शासन ७५%)
४) दुभत्या जनावरांसाठी अनुदान (लाभार्थी ५०% शासन ५०%)
५) वृक्ष लागवडीच्या संरक्षणाकरीता प्रोत्साहन (प्र.मा.प्र.क्षेत्र ५० पैसे)

अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in
संगणक संकेतांक - २०१२०७१३१११०७०३०३०३

Scanned by CamScanner

# सयुंक्त वनव्यवस्थापन समिती संकलित शासन निर्णय

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती
**महाराष्ट्र शासन**
महसूल व वनविभाग
(प्रथम शासन निर्णय)
शासन निर्णयक्रमांक .एस.एल .एफ
१०९१/प्र. क.११९/फ- ११,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक १६ मार्च १९९२

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती
**महाराष्ट्र शासन**
महसूल व वनविभाग
(द्वितीय शासन निर्णय)
शासन निर्णयक्रमांक .एम.एस .सी
२०००/प्र. क.१४३/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक २५ एप्रिल २००३

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती
**महाराष्ट्र शासन**
महसूल व वनविभाग
संत तुकाराम वनग्राम योजना
शासन निर्णयक्रमांक .एफ.डी.एम
२००५/प्र. क.३१३/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक २३ नोव्हेंबर २००६

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती
**महाराष्ट्र शासन**
महसूल व वनविभाग
(प्रथम शासन निर्णय)
शासन निर्णयक्रमांक .एफ.डी.एम
२०११/प्र. क.१००/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक ५ ऑक्टोबर २०११

सयुंक्त वनव्यवस्थापन समिती
**महाराष्ट्र शासन**
महसूल व वनविभाग
एल.पी.जी.गैस वाटप शासन निर्णय
शासन निर्णयक्रमांक .एम.डी.एम
२०१२/प्र. क.४/फ- २,
मंत्रालय मुंबई ४०००३२
दिनांक १० जूलै २०१२

Scanned by CamScanner